CMYK


|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ अंक : ७ सोमवार दि. ६ फेब्रुवारी २०२३ ते रविवार दि. १२ फेब्रुवारी २०२३ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## धक्का लागल्याच्या वादातून तरुणाचा केला भोसकून खून

लातूर/क्राईम रिपोर्टर

संदल मिरवणुकीत धक्का लागल्याचा राग मनात धरून एका तरुणास चाकूने भोसकून ठार केले ची घटना शहरातील ताजुद्दीन बाबा दर्गा रोडवरील एका जिम समोर घडली आहे. याप्रकरणी मयताच्या भावाने दिलेल्या तक्रारीवरून विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात एकावर विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिस सूत्राकडून मिळालेली माहिती अशी की गुरुवारी याच परिसरात संदल मिरवणूक निघाली होती या मिरवणुकीमध्ये अनेक तरुण ...पान २ वर

## पत्नीच्या जीवनामध्ये एक परपुरुष आला तांत्रिकाला सुपारी देऊन पतीचा खून केला

विरार/क्राईम रिपोर्टर



मयत कमरुद्दीन

संसारात भांड्याला भांडे लागून पती पत्नीमध्ये भांडणे होतात. त्यात काही नवे नाही. पण जेंव्हा त्या दोघांमध्ये तिसऱ्याची एन्ट्री होते. तेंव्हा मात्र प्रेमाचा त्रिकोण कुणातरी एकासाठी जीवघेणा ठरतो. कारण आपल्या पत्नीने आपल्याशीच एकनिष्ठ राहावे दुसऱ्याकडे चुकुनही बघू नये अशी प्रत्येक पतीची अपेक्षा असते. पण सगळ्याच गोष्टी माणसाच्या हातात नसतात. कधी कधी पत्नीला पतीकडून जे प्रापंचिक सुख समाधान हवे असते ते तिला मिळत नाही, अशावेळी तिला ज्या गोष्टी हव्या असतात त्या शोधण्याचा ती प्रयत्न करते आणि त्यातूनच तिचा पाय घसरतो आणि कुणीतरी तिसरा इसम तिच्या जीवनात येतो. तिच्या जीवनात आलेला तो तिसरा इसम जर तिच्या पतीपेक्षा उजवा असेल आणि ज्या गोष्टी तिला पतीकडून मिळत नाहीत त्या गोष्टी जर त्या परपुरुषाकडून तिला मिळत असतील तर तोच तिला हवाहवासा वाटू लागतो आणि त्यालाच ती सर्वस्व मानून त्याच्यासाठी काहीही करायची कुठल्याही थराला जाण्याची तिची तयारी असते. अशावेळी पतीने वेळीच सावध होऊन प्रेमाचा हा तिसरा कोण मोडून टाकला नाही तर त्याच्या जीवाला कधीही तिच्यापासून धोका होऊ शकतो. गोरेगाव पश्चिम येथील शहीद भगतसिंग नगर क्रमांक १ मध्ये अशीच घटना घडली आहे. विवाहित असूनही दुसऱ्याच्या प्रेमात पडलेल्या एका महिलेने तिच्या अनैतिक संबंधात अडथला ठरणाऱ्या पतीला मार्गातून हटवण्यासाठी चक्क शेजारच्या दांपत्याला १ लाखांची सुपारी देऊन पतीची हत्या घडवून आणली. मात्र पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.




२७/१/२०२३ रोजी वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नायगाव पूर्व रिक्षा स्टँडच्या पुलाखाली ४० ते ४५ वर्ष वयाच्या अनोळखी इसमाचा मृतदेह खाडीच्या पाण्यातून वाहत असल्याची माहित वालीव पोलिसांना मिळाली हि माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी जेजे रुग्णालयात पाठवण्यात आला. शवविच्छेदनानंतर आलेल्या अहवालात धारदार शस्त्राने डोक्यावर आणि गळ्यावर वार करण्यात आल्याने त्या अनोळखी इसमाचा मृत्यू झाल्याचे नमूद करण्यात आले होते. या प्रकरणी वालीव पोलीस ठाण्यात २९/१/२०२३ रोजी गु.र.क्र १०५/२०२३ भाद्वीस ३०२,२०१ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. खाडीच्या पाण्यात कुजलेल्या अवस्थेत सापडलेल्या या मृतदेहाची प्रथम ओळख पटवणे गरजेचे होते. त्यानुसार मुंबई, ठाणे, नवी मुंबई आदी पोलीस मुख्यालयांतर्गत





येणाऱ्या पोलीस ठाण्यांचे मिसिंग रजिस्टर चेक करीत असताना बांगूर नगर पोलीस ठाण्यात मयताचे कपडे आणि वर्णनाशी मिळती जुळती एक व्यक्ती मिसिंग असल्याचे आढळून आले.

सदर मिसिंग व्यक्तीचे नाव कमरुद्दीन मोहमद उस्मान अन्सारी (३५) असल्याचे समजले. कमरुद्दीन हा सुविधा चाल भगतसिंग नगर १ गोरेगाव पश्चिम येथील रहिवासी होता. दरम्यान पोलिसांनी त्या पत्त्यावर जाऊन चौकशी केली असता त्यांचे शेजारी बिलाल ...पान २ वर

## अखेर परमेश्वराने बरोबर न्याय केला हत्या करून मृतदेह फेकताना खुनी मेला






सावंतवाडी (आंबोली)/क्राईम रिपोर्टर

जो माणूस दुसऱ्यासाठी खड्डा खोदतो तोच खड्डा कधी कधी त्याचीच खबर बनते. असाच काहीसा प्रकार दोन विटभट्टी मालकांच्या बाबतीत घडला आहे. कराडमध्ये वीटभट्टीचा व्यवसाय करणारे भाऊसाहेब माने आणि तुषार पवार या दोघांनी मजूर पुरवण्यासाठी एका दलाला पैसे दिले होते. पण त्याने त्या दोघांना फसवले. त्यामुळे त्या दोघांनी त्याला त्याच्या गावातून आणले आणि गाडीतच त्याला ठार मारले. त्यानंतर आंबोली घाटात त्याचा मृतदेह दरीत फेकायचा होता, पण रात्रीची वेळ आणि दोघेही दारू प्यायलेले होते. त्यामुळे मृतदेह फेकताना भाऊसाहेब मानेही १५० फुट खोल दरीत कोसळला आणि त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर घाबरलेल्या तुषार मानेला या सर्व घटनेची माहिती आपल्या नातेवाईकांना दिले आणि त्यांनी पोलिसांना कळवले. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी येऊन दोन्ही मृतदेह बाहेर काढून तुषार पवारला अटक केली.

सातारा जिल्हयातील कराड येथील गोळेश्वर येथील भाऊसो अरूण माने व एकवीरा कॉलनी कराड येथील तुषार शिवाजी पवार या दोघाचा वीट व्यवसाय आहे. हल्ली प्रत्येक व्यवसायात स्पर्धा निर्माण झाली असल्याने कुशल कामगारांची कमतरता जाणवत आहे. त्यामुळे अनेक कारणांनी वीट व्यवसाय हा अडचणीत आल्याचे दिसत आहे. खरे तर वीट व्यवसाय हा पारंपारीक कुंभार लोकांचा व्यवसाय आहे. परंतु आज काल कोणताही व्यवसाय कोणी ही करू लागल्याने त्यात भांडवलदार लोकांनी शिरकाव केल्याचे दिसून येते. वीट तयार करण्यासाठी माती कोळसा ज्याप्रमाणे लागतो त्याप्रमाणे कुशल मजुर ही लागत असतात.हे मजुर बऱ्याचवेळेला परप्रांतातून आलेले असल्याने त्याच्या अंगावर लाखो रूपयांची बाकी असते. हजारो लाखो रूपये अंगावर बाकी घेतल्याखेरीज मजुर मिळेनासे झालेत. त्यामुळे त्याची चोची पुरविण्याचे काम मालकांना करावे लागत आहे. अंगावर बाकी दिली नाही की मजुर मिळेनासे झालेत म्हणून काही मालकांनी यातून शक्कल लढवून उस तोड मजुरासारखेच वीट मजुर मिळविण्यासाठी मजुर पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराला गाठायचे आणि त्याला लाख दोन लाख रूपये देवून मजुर मिळवायचे असा प्रकार ते करीत आहे. भाऊसो माने याच्या ओळखीचा ...पान २ वर

## चारीत्र्याच्या संशयाने पतीचे डोके फिरले दारूच्या पार्टीत पत्नीलाच ठार मारले



आरोपी वैभव आणि मयत पिंकी

विरार/क्राईम रिपोर्टर

संशय खूप वाईट असतो. संशयामुळे माणसाच्या हातून काहीही घडू शकते. संशय माणसाचा संसार आणि जीवनही उध्वस्त करून टाकते. खास करून नोकरदार पत्नी असेल तर तिच्यावर अधिक संशय घेतला जातो. विरारमध्ये अशाच एका घटनेत पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेणाऱ्या पतीने आपल्या दोन मित्रांच्या मदतीने पत्नीची हत्या केली. मात्र सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने विरार पोलिसांनी हा गुन्हा उघडकीस आणून यातील एका आरोपीला अटक केली आहे.

१ फेब्रुवारी २०२३ रोजी विरार पूर्वच्या शंकरपाडा भागातील जीवदानी अपार्टमेंटमध्ये पिंकी वैभव पाटील (२७) या महिलेचा मृतदेह सापडला होता. दोन दिवस घर बंद असल्याने घरातून घाणेरडा वास येत असल्याने शेजाऱ्यांनी विरार पोलिसांना कळवले. त्यानंतर पोलिसांनी घरमालक प्रमोद पाटील यांना बोलावून त्यांच्याकडे असलेल्या दुसऱ्या चावीने दरवाज उघडला. तेंव्हा आत पिंकी पाटील हिचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत सापडला. पोलिसांनी पंचनामा करून तो शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवून दिला. मयत पिंकी पाटील आणि तिचा पती वैभव पाटील हे दांपत्य प्रमोद पाटील यांच्या त्या फ्लॅटमध्ये भाड्याने राहायचे असे चौकशीत समजले. दरम्यान मयत महिलेचा पती वैभव पाटील हा गायब होता. त्याचा मोबाईल सुद्धा स्वीच ऑफ होता. त्यामुळे त्याच्यावरच पोलिसांचा संशय बळावला. त्यातच मयत पिंकीचा मुंबईच्या चिराबाजारमध्ये राहणारा भाऊ बाळू दौलत कोकणी आणि विरारच्या घासकोपरीमध्ये राहणारी बहिण बबिता जितेश भोईर यांनी पोलिसांना सांगितले कि पिंकी आणि वैभव यांचे प्रेम होते. पण आमच्या वडिलांचा त्यांच्या प्रेमाला विरोध असल्याने पिंकीने वैभव ...पान २ वर

## त्या दोघांची 'लव्हस्टोरी' रक्ताने लाल झाली प्रेयसीला फिरवणाऱ्याची प्रियकराने हत्या केली



मयत मुद्दसीर

मुंबई/एस.कुमार

आपली प्रेयसी दुसऱ्याबरोबर फिरतेय हे कुठल्याही प्रियकराला सहन होणारे नाही. पण आजकाल शाळा कॉलेजातले प्रेम हे अळवावरच्या पाण्याच्या थेंबासारखे झाले आहे. त्यामुळे ब्रेकअप आणि प्याचप हा तरुणीच्या रुटीन आयुष्याचाच एक भाग बनलाय. त्यातून वाद हाणामाऱ्या आणि खून खराबा होतोच पण काहींना हे सहन होत नाही आणि त्यांच्या हातून मग काहीही घडू शकते. चेंबूरमध्ये एका तरुणाची प्रेयसी दुसऱ्यासोबत फिरताना दिसली म्हणून तिच्या प्रियकराने मित्राच्या मदतीने प्रेयसीच्या दुसऱ्या हिरोची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.



चेंबूरच्या वाशीनाका परिसरातील जयभवानी को. ऑ.हौ. सोसायटी, रुम नं. ११९मध्ये मुद्दसीर मुख्तार शेख हा १९ वर्षाचा तरुण आपले आईवडिल व भावंडासह राहत होता.तो चेंबूर येथील विवेकानंद एज्युकेशन सोसायटीच्या बीएएफ च्या द्वितीय वर्षाला शिकत होता. तो नियमित कॉलेजला जात-येत होता. गुरुवारी दिनांक २ फेब्रुवारी रोजी ५.५० च्या सुमारास मुद्दसीर हा प्लांट नंबर ८४ च्या समोर रोड नंबर २ सिंधी सोसायटी चेंबूर, सिंधी पोलीस चौकीच्या दिशेने रोडने पायी चालत जात होता .यावेळी ॲक्टिवा मोटरसायकल वरून आलेल्या दोन अनोळखी तरुणांनी मुद्दसीर शेख याच्यावर त्यांचकडील धारदार शस्त्राने त्याच्या पोटावर, छातीवर, डोक्यावर सपासप वार करून पळून गेले. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या मुद्दसीर शेख या तरुणाला आजूबाजूच्या रहिवाशांनी तातडीने जवळील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी तपासून त्यास मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळाच चुनाभट्टी पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी ...पान २ वर

## सासुरवाडीत जावयाला संपवले दुपारी दारुड्या पतीची पत्नीनेच दिली सुपारी

अकोला/क्राईम रिपोर्टर



मयत सचिन

दारुड्या माणसाचा शेवट कधी कधी त्याच्या कुटुंबातील लोकांच्या हातूनच होत असतो. कारण रोजच्या त्रासाला कंटाळलेला माणूस रक्ताच्या नात्यातला असला तरी त्याची परवा केली जात नाही. पास्टूलमध्ये राहणारा सचिन बांगर याला दारूचे व्यसन होते आणि दारू पिऊन आला कि तो पत्नी आणि मुलांना मारहाण करायचा. त्यामुळे पत्नी मुलांना घेऊन माहेरी गेली, तर तिथेही जाऊन तो तमाशा करू लागला. त्यामुळे चिडलेल्या पत्नीने त्याचा कायमचा काटा काढण्यासाठी शेजाऱ्याला ३० हजारांची सुपारी दिली आणि सचिन दारू पिऊन सासुरवाडीला येताच पत्नीने शेजाऱ्याच्या मदतीने त्याचा गळा दाबून खून केला. त्यानंतर मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी शेजाऱ्याने आपल्या १५ वर्षाच्या मुलाची मदत घेतली आणि त्याचेही आयुष्य बरबाद केले. कारण पोलिसांनी तिघांनाही अटक केली आहे.

अँब्युलन्स चालक सचिन बांगर यास दारु पिण्याचे भारी व्यसन होते. अकोला जिल्ह्यातील पास्टूल या गावी तो रहात होता. अकोला जिल्ह्यातील पुंडा या गावी राहणाऱ्या कांचन नावाच्या तरुणीसोबत त्याचा विवाह तिन वर्षापुर्वी झाला होता. लग्नाला तीन वर्ष झाल्यानंतर त्याच्या संसारवेलीवर दोन मुलींचे आगमन झाले. त्याची मोठी मुलगी साडेतीन वर्षाची तर लहान दोन वर्षाची आहे. सचिन आणि कांचन या पती-पत्नीमध्ये लग्नानंतर वादविवाद नव्हते. दोन मुली, पत्नी असा त्याचा संसार सुरळीत सुरू होता. तसेच सचिनचे आई-वडील सुरत येथे रहायला गेल्यामुळे सचिन हा आपल्या कुटुंबासमवेत पास्टूल ...पान २ वर

## तिसरे लग्न केले पण तेही नाही टिकले पाच लाखांसाठी पत्नीला मारून टाकले

जालना/क्राईम रिपोर्टर



मयत कविता

हुंडा हा मानवतेला शाप आहे. तसेच हुंडा घेणे कायद्याने गुन्हा आहे. पैशासाठी पत्नी किंवा तिच्या माहेरच्यांना त्रास देणे हा सुद्धा गुन्हाच आहे. पण पैशाची हाव असलेले लोक कायदा किंवा पोलिसांना अजिबात घाबरत नाहीत, अशापैकीच एक होता जालना जिल्ह्यातील पाल पाथ्री गावातील रागुनाथ आढाव रघुनाथची दोन लग्न झाली होती, पण हि गोष्ट लपवून त्याने कविताशी तिसरे लग्न केले आणि वर्षभरातच घर घेण्यासाठी तिच्याकडे ५ लाख मागू लागला. मात्र तिने नकार देताच त्याने तिची हत्या करून ट्रक्टर खाली सापडून ती मेल्याचा बनाव केला, पण पोलिसांनी सत्य शोधून काढले आणि रघुनाथ याला अटक केली.

पहिले लग्न मोडल्यानंतर कविता साखळे या तरुणीचे गेल्या वर्षी दुसरे लग्न झाले. जालना जिल्ह्याच्या फुलंब्री तालुक्यातील पाल पाथ्री या गावातील गजानन रघुनाथ आढाव याच्यासोबत कविताचे हे दुसरे लग्न होते. गजानन चाळीस वर्षाचा तर कविता २९ वर्षाची आहे. लग्नापुर्वी असलेली कविता साखळे ही गजानन सोबत लग्न केल्यानंतर कविता आढाव म्हणून ...पान ६ वर

## तिला झाल्या दोन्ही मुली पतीने घेतला पत्नीचा बळी



मयत अश्विनी

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर



आरोपी एकनाथ

'बेटी बचाव बेटी पढाव' हि सरकारची घोषणा आहे. कारण आजकाल मुलगा आणि मुलगी यात कुणी फरक मानीत नाही. आजकालच्या महिला पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करतात. शेती करून घर संभाळण्या पासून ते राष्ट्रपती पदापर्यंत महिलांनी मजल मारली आहे. देशातील सर्वच क्षेत्रात आज महिलांचा बोलबाला आहे असे असताना ग्रामीण भागात मात्र अजूनही मुलगा हा वंशाचा दिवा आहे आणि मुलगी दिल्या घरची आहे अशी बुरसटलेली विचारसरणी आहे, त्यातून मुलींच्या जगण्यावर अनेक निर्बंध घातले जातात. मुलीच्या जन्माचा कुणाला आनंद होत नाही अशी काही ठिकाणी परिस्थिती आहे. कोल्हापूर जवळच्या दोनवडे गावात लागोपाठ दोन मुली झाल्या म्हणून एका इसमाने पत्नीचा छळवाद केला आणि नंतर तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

कोल्हापूर कणकवली हायवेवरील कोल्हापूर पासून जवळच असणारे दोनवडे हे गाव तसे सधन म्हणून ओळखले जाते. येथील एकनाथ कृष्णांत पाटील याचा विवाह तेथून जवळच असणाऱ्या केर्ले येथील बाबसाहेब माने याची मुलगी अश्विनी बरोबर गेल्या १३ वर्षापूर्वी सामाजाच्या रितीरिवाजाप्रमाणे झाला. एकनाथ याचे कोल्हापूरातील उद्यमनगर येथे रंग व रंग काम करण्याचे विक्रीचे दुकान आहे. अश्विनी ही त्याला अनुरूप अशीच होती. त्या दोघांचा संसार बहरत फुलत असताना लग्नानंतर त्यांना पहिली मुलगी झाली त्यांनी तिचे नाव समृध्दी असे ठेवले. तिच्या पायगुणांनी त्याचा संसार हा फुलतच होता. घरची परिस्थीती सधन असल्याने कशाची ही कमतरता नव्हती. ...पान ६ वर

CMYK

पान १ वरून....

## धक्का लागल्याच्या वादातून...

सहभागी झाले होते. व त्याच्या तालावर नाचत असताना फैजल आरिफ पुरेशी (वय १८ वर्षे राहणार भुईगल्ली लातूर) यांच्यात व जौद जावेद सय्यद (वय २२ वर्ष राहणार बौद्ध नगर) यांच्यात वाद झाला. या वादातूनच जेद सय्यद याने फैजल अरे कुरेशी याच्या पोटात धारदार च्या खूपसून त्याचा खून केला. ही घटना ताजुद्दिन बाबा दर्गा रोडवरील मारवेल जिम समोर घडली घटनेची माहिती मिळताच विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्यासह पोलिस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत घटनेचा आढावा घेतला. मयत फैजल याचा भाऊ रेहान अरिफ कुरेशी याचा फिर्यादीवरून विवेकानंद पोलीस ठाण्यात गुरंन ८२/२३ कलम ३०२ ५०४ भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून या खून प्रकरणातील संशयताला अटक करण्यात आली आहे या या प्रकरणाचा अधिक तपास विवेकानंद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक खंदाडे हे करत आहेत.

## पत्नीच्या जीवनामध्ये एक परपुरुष...

उर्फ मुल्ला निजाम पठाण (४०) आणि त्याची पत्नी सौफिया बिलाल पठाण (२८) घटना घडल्यापासून गायब असल्याचे समजले. त्यानंतर या दांपत्याचे मोबाईल टॉवर लोकेशन आणि इतर तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांनी शोध सुरु केला असता हे दांपत्य वापीमध्ये असल्याचे समजले. त्यानंतर पोलिसांनी तेथे जाऊन त्यांना ताब्यात घेतले आणि त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी आपणच पैशासाठी कमरुद्दीनचा खून केल्याचे मान्य केले. आपणास कमरुद्दीनच्या पत्नीनेच १ लाखांची सुपारी दिल्याचे सांगितले. त्यामुळे मयत कमरुद्दीन याची पत्नी आशिया अन्सारी हिला ताब्यात घेऊन चौकशी केली असता तिचे दुसऱ्या इसमाशी प्रेमसंबंध असल्याने तिनेच पतीच्या हत्येची सुपारी दिल्याचे उघडकीस आले. बिलाल उर्फ मुल्ला पठाण हा वैदू तसेच तांत्रिक असल्याने तो आपले काम करू शकेल या विश्वासाने तिने बिलाल पठाणला पतीच्या हत्येची सुपारी दिली आणि बिलाल व त्याच्या पत्नीने कमरुद्दीनला नायगाव खाडी जवळ नेऊन त्याच्या डोक्यात जड वस्तूने प्रहार करून व नंतर त्याची गळा चिरून हत्या केला आणि मृतदेह खाडीत टाकला, असे चौकशीत निष्पन्न झाल्याने या दाम्पत्यासह कमरुद्दीनची पत्नी व तिच्या प्रियकरावरही गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. सदर प्रकरणी गुन्हे शाखेचे पोलीस उपयुक्त अविनाश अंबुरे, सहा.पोलीस आयुक्त अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शाहूराज रणवरे, सपोनी सुहास कांबळे, स.फौ.रमेश भोसले, संजय नवले, पो.हवा. रमेश आलदर, चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, दादा आडके, सुधीर नरले, पो.न. प्रशांतकुमार ठाकूर, पो.अ.अमोल कोरे, गुन्हे शाखा २ वसई व स.फौ.संतोष चव्हाण सायबर गुन्हे शाखा यांनी भाग घेतला.

## अखेर परमेश्वराने बरोबर न्याय ...

पंढरपुर येथील सुशांत खिल्लारे हा होता तो उस तोड मजुर आणि वीट व्यवसायातील मजुर पुरविण्याचे काम करीत असतो हे माने याला माहित होते. त्यामुळे माने याला मजुर मिळेनात म्हणून त्याने सुशांत याला आपल्या वीट व्यवसायासाठी मजुर पुरविण्याचे काम दिले.सुशांत खिल्लारे याने मजुर पुरविण्याचे मान्य केले. मागील वर्षी वीट भट्टी हंगाम सुरू होण्यापूर्वी माने यांना मजुरांची आवश्कता होती.त्यावेळी त्यांना पुरेशा प्रमाणात मजुर मिळाले नाहीत त्यावेळी त्यांनी पुढील वर्षी तरी आपल्याला मजुर मिळावेत म्हणून सुशांत खिल्लारे यांना गाठून मला तुमच्या भागातील मजुर पुरविणार काय? अशी विचारणा केली. त्यावेळी खिल्लारे यांनी माने यांना मी मजुर देतो मला तीन लाख रूपये दया अशी अट घातली. कारण मजुरांना त्याचे अंगावर पैसे दयावे लागतात त्याशिवाय ते इकडच्या भागात कामाला येत नाहीत. माझ्याकडे मजुर मोठया प्रमाणात आहेत. तुम्ही मला तीन लाख रूपये दिलेत तर मी तुम्हाला मजुर पुरवू शकतो असे सांगितले. त्यावेळी भाऊसो माने व तुषार पवार या दोघांनी विचार करून सुशांत याला मजुर पुरविण्याकामी तीन लाख रूपये दिले.हे तीन लाख रूपये घेऊन सुशांत हा मागील वर्षी पंढरपुरला आला त्यावेळेपासून तो परत कराड भागात आला नाही. एक तर त्याने माने व पवार यांना पैसे घेऊन ही मजुर पुरविले नाहीत. उलट पवार आणि माने यांनी त्याला फोन लावला असता तो त्यांना उडवाउडवीची उत्तरे देत होता. एक तर तो त्यांना मजूर देतो म्हणून फसवित होता शिवाय त्याचेकडून घेतलेले तीन लाख रूपये देखील परत करीत नव्हता. मजुर ही कामाला नाहीत त्यामुळे वीट भट्टीचा व्यवसाय अडचणीत आला होता. त्यामुळे पवार व माने हे खिल्लारे याच्यावर चिडून होते आपले तीन लाख रूपये अडकल्याने ते दोघे ही खिल्लारे याचेवर चिडून होते. सुशांत खिल्लारे याने आपली फसगत केली आहे अशी त्याची भावना झाली होती. पैसे घेऊन गेला तो परत आलाच नाही. शिवाय मजुर ही दिले नाहीत त्यामुळे आता काय करायचे याचा ते विचार करीत होते. अलिकडे सुशांत खिल्लारे हा त्याचा फोन देखील उचलत नव्हता. त्यामुळे खिल्लारे यांनी आपली फसगत केली आहे हे त्या दोघांच्या लक्षात आले त्याला चांगलीच अद्दल घडविली पाहिजे असा त्यांनी विचार करून ते दोघे रविवार दि २८ जानेवारी २०२३ रोजी त्याला शोधत त्याचे गावी पंढरपुर येथे गेले. ते त्यांनी पहिल्यांदा देवदर्शन घेऊन परत त्याचा शोध सुरू केला असता तो त्यांना दुसऱ्या दिवशी सकाळी पंढरपुर पासून लांब दुसऱ्या गावात त्यांना मिळाला. त्यांनी त्याला बरोबर आपल्या कारमध्ये घेतले आणि कराडकडे आणले. कारमधून येत असताना त्या दोघांनी त्याला तीन लाख रूपया विषयी विचारले असता तो त्यांना मी ती रक्कम आपल्या भागातील मजुरांना दिली आहे. पण ते मजुर आता कराड भागात कामावर यायला तयार नाहीत पुढच्या सिझनला येणार आहेत असे सांगितले. त्याच्या बोलण्यावर त्याचा विश्वास बसत नव्हता. त्याला कायमची अद्दल घडवायचीच म्हणून त्या दोघांनी कारमधून कोल्हापूरला आणत असताना वाटेत त्यांनी त्याला भरपुर दारू पाजली आणि त्यांनी ही आपल्या घशाखाली दारू ढोसली. त्यांना दारूची नशा झाल्यावर त्याला कसे मारायचा याचा ते विचार करीत होते. एक तर तो घेतलेले पैसे ही देत नव्हता. शिवाय मजूर ही देत नव्हता म्हणून त्यांनी त्याला गाडीतच जबर मारहाण केली.अगोदरच त्यांनी त्याला मारहाण केली असल्याने तो त्यांच्या हातापाया पडत होता. त्यावेळी त्यांनी त्याला एक तर तु आम्हाला मजूर दे नाही तर आमचे पैसे दे त्याशिवाय आम्ही तुला सोडत नाही अशी धमकी दिली. कराडहून कोल्हापूरच्या दिशेने येत असताना हायवेवरील किणी टोल नाक्याजवळ ते आले असता परत त्यांनी त्याला दारूच्या नशेत जबर मारहाण केली. त्यात रागाच्या भरात भाऊसाहेब माने याने त्याचा गळा आवळून धरला. सुशांत हा मला सोडा मला मारू नका असे म्हणत असताना ते दोघे ही त्याला अर्वाच्च भाषेत शिव्या देत त्याचा गळा सोडत नव्हते. भाउसाहेब माने याने त्याचा गळा धरला तर तुषार पवार याने त्याचे हातपाय धरले. त्या दोघांच्या ताकतीपुढे त्याचे काही चालले नाही. तो टाचा घासत कारमध्येच निपचिप पडला. त्याचा आपल्या हातून मृत्यू झाला आहे हे लक्षात येताच ते दोघे ही घाबरले. त्याची दारूची नशा पुर्ण उतरली. आता याच्या मृतदेहाची विल्हेवाट कशी लावायची याचा ते दोघे विचार करीत असताना त्याच्या नजरेसमोर एकदम आंबोली घाट आला. त्या घाटाच्या दरीत त्याचा मृतदेह टाकून दयायचा आणि परतायचे असा त्यांनी विचार केला. कारमध्ये त्यांनी डिक्कीत त्याचा मृतदेह झोपविला आणि संध्याकाळी ७.३०च्या दरम्यान ते आंबोलीला निघाले. तास दोन तासात आपण आंबालीला पोहचतो हे त्यांना माहित होते. कोणाच्या काही लक्षात येवू नये म्हणून त्यांनी निपाणीच्या तंवदी घाटातून उत्तुर, आजरा मार्गे आंबोलीला निघाले. वाटेत त्या दोघांनी परत दारू ठोसून जेवण करून पुढे गेले. आंबोली पर्यत जात असताना त्याची दारू उतरली म्हणून त्यांनी आजऱ्यात परत ढोसली, आता त्याचे अंगात पुर्ण दारू भिणली होती. त्यांना कशाचीच शुध्द नव्हती. त्या अवस्थेत त्यांनी कसे बसे आंबोली गाठले. आंबोलीच्या मुख्य धबधब्या जवळ आता पाणी नसल्याने तेथील दरी बघून ते थांबले. रात्रीचे त्यावेळी ११ वाजून गेले होते. रस्त्याला ही त्यावेळी तुरळक वाहने होती म्हणून त्यांनी काही क्षण गाडीत बसून विचार केला. धबधब्या जवळ असणाऱ्या मोठया दरीत त्याचा मृतदेह टाकायचा आणि लगेच माघारी परतायचे म्हणजे कोणाला काही शंका येणार नाही असे त्यांना वाटले. म्हणून त्यांनी कार दरीच्या बाजुला असणाऱ्या कटडयाजवळ घेतली. तेथे अगोदर कारमधून तुषार उतरला आणि त्याने आजुबाजुचा अंदाज घेतला. कारमधून उतरण्याच्या आधी भाऊसाहेब याने कारची किल्ली आपल्याकडे घेतली होती. व तशीच कार चालू ठेवली होती. रस्त्याला कुणी नसल्याने त्या दोघांनी घाईगडबडीत कारमधून सुशांतचा मृतदेह बाहेर काढला. कार तशीच चालू होती. भाऊसाहेब माने हा कट्ट्यावर उभा राहिला तर तुषार याने सुशांतचा मृतदेह कट्टयावर ठेवला. दारूच्या नशेत असल्याने त्यांना पुढचे काही दिसत नव्हते. कार चालू असल्याने कोणाच्या काही लक्षात येण्याचा काही प्रश्न नव्हता. गडबडीत त्याचा मृतदेह खाली ढकलण्याच्या नादात भाऊसाहेब याचा कट्डयावरून तोल गेला. सुमारे दीडशे फुट दरीत तो पडत असताना भाऊसाहेबाचे डोके दरीतील खडकावर जोरात आपटले. सुशांतच्या मृतदेहा बरोबर तो ही खाली खोल दरीत पडला. तो खाली पडताना बघून तुषार हा ओरडू लागला होता. त्याला त्याने सावरण्याचा प्रयत्न केला परंतु काही कळायच्या आतच मृतदेहा बरोबर भाऊसाहेब हा खाली पडल्याने तो काहीच करू शकला नाही समोरचे ते दृश्य बघून तुषारची पाचावर धारण बसली आपण यात आता पुरते अडकलो गेलो आहोत हे त्याच्या लक्षात आले. पुढे काय करायचे हे त्याला सुचत नव्हते. त्याने मागचा पुढचा विचार न करता परत आपण एकटेच माघारी परतयाचे म्हणून चालू कार घेऊन तो निघाला. कसे बसे तो आंबोलीच्या पुढे आल्यावर वाटेत त्याची कार पेट्रोल संपल्याने बंद पडली.आता काय करायचे या विचारात तो पडला. एक तर किल्ली नाही पुढे कसे जायचे याचा विचार करीत तो कारमध्येच रात्रभर बसला. दुसऱ्या दिवशी त्याने उठून ११२ क्रमांकवर सपर्क साधून त्याने काल घडलेल्या घटनेची माहिती आपल्या कराड येथील नातेवाईकांना दिली. ही माहिती समजताच त्याच्या नातेवाईकांनी कराड पोलीस स्टेशन गाठून आंबोली नजीक घडलेल्या प्रकारची माहिती दिली.कराड पोलीसांनी तातडीने हालचाल करून या घटनेची माहिती सावंतवाडी पोलीसाशी संपर्क साधला.या घटनेची माहिती मिळाल्यावर पोलीसांनी तातडीने हालचाल करीत घटनास्थळ गाठले. स्थानिकांच्या मदतीने पोलीसांनी रात्री उशिरा दीडशे फूट खोल दरीतून दोन्ही मृतदेह बाहेर काढले. घटनेचा आणि घटनास्थळाचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह शवच्छिेदनासाठी सिंधुदुर्ग येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. घटनास्थळी जिल्हा अतिरिक्त पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांनी भेट देऊन घटनेची माहिती घेतली. खूनाची ही घटना कराड पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असल्याने सावंतवाडी पोलीसांनी ही केस कराड पोलीस ठाण्याला वर्ग केला आहे.संशयीत आरोपी तुषार शिवाजी पवार (वय ३०) याला सावंतवाडी पोलीसांनी त्याला कराड पोलीसांच्या ताब्यात दिले. कराड पोलीसांनी सुशांत आप्पासो खिल्लारे (वय ३५) रा.पंढरपूर याचे अपहरण करून खून करणे व पुरावा नष्ट केल्या प्रकरणी मयत भाऊसाहेब अरूण माने (वय ३५) व तुषार शिवाजी पवार (वय ३०) रा.दोघे कराड याचे विरोधात गुन्हा दाखल केला. यातील तुषार पवार याला पोलीसांनी मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेली कार जप्त केले.या घटनेचा पुढील तपास कराड पोलीस करीत आहेत.

## चारीत्र्याच्या संशयाने पतीचे डोके ...

सोबत पळून जावून लग्न केले. पण संसारात ती सुखी नव्हती. ती कामाला जायची, पण तो तिच्या चारित्र्यावर संशय घ्यायचा. त्यातून दोघांमध्ये भांडणे व्हायची. तो तिला मारहाण करायचा, दोघांनाही दारूचे व्यसन होते अशी माहिती पिंकीच्या भाऊ आणि बहिणीकडून मिळाली. त्यानंतर तपास सुरु झाला. नातेवाईकांची चौकशी करण्यात आली. याच दरम्यान मयत पिंकीच्या फरारी पतीचा मेव्हणा किरण जाधव याने सांगितले कि वैभव पाटीलच्या व्हॉट्सअप स्टेटसवर सॉरी मम्मी-पप्पा मी आज एक मोठ पाऊल उचलणार आहे असे लिहलेले त्याने पाहिले होते. शिवायन सॉरी ताई असे बहिणीला उद्देशूनही त्याने लिहले होते. हि माहिती मिळताच पिंकीचा खून वैभवनेच केला असावा याची पोलिसांना खात्री पटली. त्यानंतर त्यांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्यात जीवदानी अपार्टमेंट येथून दोन तरुण त्या रात्री मोटार सायकलवरून जाताना दिसले. त्यांची ओळख पटवून त्यातील एकाला पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली असता त्याने गुन्हा कबूल करताना सांगितले कि त्या रात्री वैभवच्या घरात आम्ही दारू पीत बसलो होतो. आमच्या दारू पार्टीत पिंकीही सामील झाली होती. याच वेळी वैभवने तिच्या चारित्र्यच विषय काढला आणि त्यावरून दोघांमध्ये भांडण झाले. यावेळी आम्ही तिघांनी मिळून पिंकीचा खून केला. दोघांनी तिचे पाय धरले आणि वैभवने तिचा गळा आवळून खून केला. त्यामुळे आता पोलीस वैभव आणि त्याच्या आणखी एका फरारी साथीदाराचा शोध घेत आहेत. या प्रकरणी विरार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक चौगुले करीत असल्याची माहिती विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी दिली.

## त्या दोघांची 'लव्हस्टोरी' रक्ताने लाल ...

मृत तरुणाचा प्रेताचा व घटनास्थळचा पंचनामा करून तो मृतदेह पोस्टमोर्टमसाठी रुग्णालयात रवाना केला. या प्रकरणी पोलिसांनी मृत तरुणाचा भाऊ मुजमिल मुख्तार शेख (वय २१) रा. जयभवानी को. ऑ.हौ. सोसायटी, रुम नं.११९, वाशीनाका, शिवाजीनगर, चेंबूर, मुंबई याने दिलेल्या फिर्यादीवरून गु.र.क. २६/२०२३, कलम ३०२, ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेची माहिती मिळाताच मुंबई गुन्हे शाखेचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. चुनाभट्टी पोलिसांसोबत गुन्हे शाखेचे पथकाने या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू केला. यासाठी गुन्हे शाखा युनिट ५, ६ आणि ७ यांची तपासाकरिता विशेष पथके तयार करण्यात आली.पथकाने या गुन्ह्यातील हल्लेखोरांचा शोध सुरू केला. अनोळखी आरोपीबाबत काही एक माहिती नव्हती. पथकाने घटनास्थळाच्या रोडवर असणाऱ्या सी. सी. टी.व्ही. फुटेजची बारकाईने पाहणी केली. तेव्हा ऍक्टिव्हा स्कुटर मोटार सायकलवर दोन तरुण संशयितरित्या फिरताना दिसुन आले.सीसीटीव्ही फुटेजमध्ये हल्लेखोरांची ओळख पटल्याने पोलिसांनी समाजमाध्यमांच्या आधारे त्यांचा माग घेण्यास सुरुवात केली.अशाच तपास पथकातील अधिकाऱ्यांना गोपनिय बातमीदारांकडून संशयित आरोपी आदित्य त्रिभुवन (१९) आणि खलफम सय्यद (२०) या दोघांची नावे मिळाली. तपास पथकाने ते राहत असलेल्या घरी जाऊन त्यांचा शोध घेतला पण ते घरी मिळाले नाही. तसेच चेंबूर परिसरात कक्ष ६ने कसुन शोध घेतला. परंतु त्यांच्याबद्दल काही माहिती मिळाली नाही. संशयित तरुणाचा मोबाईल क्रमांक बंद येत असल्यामुळे तपास करताना प्रथमतः काहीएक माहिती मिळून येत नव्हती. आरोपींचे उपलब्ध माहितीचे तांत्रिक विश्लेषण करून वरिष्ठांच्या परवानगीने कक्ष ६ ची तीन वेगवेगळी पथके तयार केली. त्यामध्ये कक्ष ७ चे प्रभारी पोलीस निरीक्षक महेश तावडे व पोलीस उप निरीक्षक रामदास कदम यांचा सहभाग होता. ही तीन पोलीस पथके कल्याण, शिवाजीनगर, गोवंडी, देवनार, चुनाभट्टी या परिसरात आरोपींचा शोध घेत होते. कक्ष ६ चे पथकाकडून गोपनीय माहिती काढून सोशल मिडीयाद्वारे अधिक माहिती घेवून मिळालेल्या माहितीचे वैज्ञानिकदृष्टया विश्लेषण केल्यानंतर अथक परीश्रमाअंती आरोपी हे धारावी, मुंबई परीसरात लपून बसल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. त्यावरून वरिष्ठांच्या आदेशान्वये कक्ष ५ चे स.पो.नि. अमोल माळी यांच्या नेतृत्वाखाली एक पोलीस पथक धारावी याठिकाणी रवाना झाले . या पथकाने धारावी मध्ये सापळा रचून आदित्य त्रिभुवन आणि खलफम सय्यद या दोघांना मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले. गुन्हे शाखेच्या कार्यालयात आणून त्यांची कसून चौकशी केली असता,या दोघांनी गुन्ह्याची कबुली दिली. आदित्य गणेश त्रिभुवन हा चेंबूर मध्ये राहत असून त्याचे याच परिसरात राहणाऱ्या १९ वर्षीय तरुणीसोबत सहा वर्षापासून प्रेमसंबंध होते. मात्र गेल्या काही दिवसांपासून तो ज्या मुलीवर प्रेम करीत होता, ती मुद्दसीर शेख या तरुणांसोबत फिरताना दिसली. त्यामुळे आदित्यला या गोष्टीचा राग आला. त्याने मुद्दसीर शेख याला समजावू सांगितले. पण तो समजावूनही ऐकत नसल्याने आदित्यने मुद्दसीरचा काटा काढण्याचे ठरविले. त्याने खलफम या मित्राला सोबत घेऊन गुरुवारी मुद्दसीर शेख याला चेंबूरच्या सिंधी सोसायटीजवळ गाठले. दोघांनीही मुद्दसीरवर चाकूने वार केले. यात गंभीर जखमी झालेला मुद्दसीरचा रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच मृत्यू झाला. त्यानंतर हे दोघे ही घटनास्थळहुन मोटरसायकलने पसार झाले. अशी माहिती प्राथमिक तपासत उघड झाली आहे. पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती, पोलीस सह आयुक्त (गुन्हे) लखमी गौतम, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) ज्ञानेश्वर चव्हाण, पोलीस उपायुक्त (प्रकटीकरण) प्रशांत कदम व सपोआ (डी पूर्व), चंद्रकांत जाधव यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष ६चे प्रभारी पोलीस निरीक्षक रविंद्र साळुंखे, कक्ष ७चे प्रभारी पोलीस निरीक्षक महेश तावडे, कक्ष ६ चे पो. नि. प्रशांत पवार, पो. नि. हणमंत ननावरे, स.पो.नि. अर्चना कुदळे, स.पो.नि. मिरा देशमुख, कक्ष ५ चे पो. नि. गोंधळी, स.पो.नि. अमोल माळी, कक्ष ६ चे पोलीस उप निरीक्षक सुभाष मुठे, पो. उप.नि. नंदकुमार बेळणेकर, कक्ष ७ चे स.पो.नि. ओलेकर, पो.उप नि. रामदास कदम, स.फो. सकपाळ, कुरडे, देसाई, पो.ह. पारकर, मिलारे, चव्हाण,शिंदे, गायकवाड, घाडगे, पाटील, घेरडे, पो.शि.कोळेकर, इंगळे, पवार, घेरडे, साळुंके, अभंग, म.पो.शि सरोदे, कदम, डाळे आणि पाटील यांचे पथकाने पार पाडली आहे.

## सासुरवाडीत जावयाला संपवले ...

येथे रहात होता. ॲम्ब्युलन्स चालवण्याचा व्यवसाय करत असलेल्या सचिनला अचानक दारूचे व्यसन लागले. तो दररोज दारू पिऊन येऊ लागला. त्याचे दारू पिणे पत्नीला पटत नव्हते. त्यामुळे घरात भांडणाला सुरूवात झाली. त्याच्या सुखी संसाराला ग्रहण लागले. पत्नीसह लहान मुलांना मारठोक करणे रोजचेच झाल्यामुळे पत्नी कांचन माहेरी निघून गेली. दोन लहान मुलांना घेऊन ती अनेक दिवसांपासून माहेरी पुंडा या गावी रहात आहे. तर सचिन दारू पिऊन दिवसाआड पुंडा गावात येत होता. गावात दारू पिऊन आल्यानंतर तो सासरच्या मंडळींना शिवीगाळ करायचा. गावातील सर्व लोकांना सचिनच्या या वागणुकीची माहिती होती. अनेकांनी त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, परंतु सचिन हा दारूच्या आहारी गेल्यामुळे कोणाचेच ऐकत नव्हता. दारूच्या व्यसनामुळे त्याने आपला जॉबही सोडून दिला. त्याच्या रोजच्या कटकटीला सर्व जग वैतागले होते. कांचनला वडील नसून, ती आईच्या आधाराने गावात रहात होती. सचिनचा त्रास असह्य झाल्यामुळे कांचनने त्याला धडा शिकवण्याचा प्लॅन आखला. सचिनला कायमचे संपवण्यासाठी तिला मदतीची गरज होती. सचिनला जीवानिशी मारून त्याने आत्महत्या केली असा देखावा करू असे तिने ठरवले. ती कामाला लागली पण कोणीच तिला मदत करायला तयार नव्हते. अखेर तिने आपला शेजारी रहात असलेला दिगंबर प्रल्हाद माळवे याला विश्वासात घेऊन तीस हजार रूपये देण्याचे आमिष दाखवून सचिनचे काम तमाम करण्यास सांगितले. दिगंबर माळवे हा तयार झाला. पती घरी आल्यानंतर कांचन ही दिगंबरला फोन करणार असे ठरले. दोन-तीन दिवसाआधीच प्लॅन आखण्यात आला. दिगंबर आणि कांचन दोघेही सचिनची वाटच बघत होते. दि. २७ डिसेंबर २०२२ रोजी सचिन धमराव बांगर (वय ३२) हा मद्यप्राशन करून पत्नीच्या गावी मुंडा येथे पोहोचला. नेहमीप्रमाणे त्याने शिवीगाळ करून परिसरात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. बळजबरीने घरात घुसला. पत्नी सोबत अरेरावी करू लागला. आजचा आपल्या आयुष्यातला शेवटचा दिवस आहे याची त्याला अजिबात कल्पना नव्हती. कांचननेही त्याला प्रतिकार केला नाही त्याला घरात घेतले. मध्यरात्री दिगंबर प्रल्हाद माळवे वाला फोन करून बोलावून घेतले. तीस हजार रूपयात दिगंबरने या कामाची सुपारी घेतली होती, म्हणून तो तातडीने कांचनकडे पोचला. येथे आल्यानंतर एका दोरीने दोघांनी सचिनचा गळा आवळला. सचिन घरातच पाय घासून मरण पावला, कांचन, दिगंबर आणि सचिन या तिघांनाच ही घटना माहित होती. यापैकी सचिन जीवानिशी गेला.

दिगंबर आणि कांचन मृतदेहाची विल्हेवाट कशी लावावी? या विचारात होते. दिवस उजाडण्याआधी मृतदेहाची विल्हेवाट लावणे अत्यंत गरजेचे होते. अशा कामांमध्ये कोण्या गावकयांची मदत घेणेही शक्य नव्हते. सचिन बांगर मरण पावल्यानंतर घरातून त्याचा मृतदेह काढायचा कसा आणि तो कोठे लपवायचा? या दोन प्रश्नांनी कांचनची झोप उडाली. कोणीच मदतीला येणार नाही हे स्पष्ट झाल्यावर दिगंबरने आपला लहान मुलगा या प्रकरणात ओढला. १५ वर्षीय मुलाला गाडी चालवण्यास तयार केले. मोटरसायकलवरून सचिन बांगरचा मृतदेह न्यायचा होता म्हणून अल्पवयीन मुलाने मोटरसायकल चालवली व सचिनचा मृतदेह मध्ये ठेऊन मागे दिगंबर बसला. गावापासून काही अंतरावर पुंडा ते बांबर्डा रोडवर व्यायाम करण्यासाठी लोखंडी पाईप लावलेले आहेत, त्या पाईपला आरोपी पिता- पुत्रांनी मृतदेह लटकवण्यासाठी प्रयत्न सुरू केले, मात्र लोखंडी पाईपची उंची फारच कमी असल्यामुळे सचिनचा मृतदेह कसा टांगायचा हा प्रश्न दिगंबरला पडला. हे सर्व काम दिवस उगवण्याआधी करायचे होते म्हणून त्यांनी घाईत तो मृतदेह पाईपला लटकून दिला. त्याने घटनास्थळावरून मुलासह पळ काढला. दुसऱ्या दिवशी सकाळी आठच्या सुमारास गावकरी घराबाहेर आले असता एक लटकलेला इसम त्यांना दिसला. यानंतर एकच गोंधळ उडाला. याठिकाणी गावकल्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली. मृतदेहाचे दोन्ही टोंगळे जमिनीला लागले असल्यामुळे ती हत्या की आत्महत्या? हा प्रश्न उपस्थित लोकांना पडला. पहाता-पहाता ही वार्ता गावभर पसरली. येथील तंटामुक्तीचे अध्यक्ष नंदू पाटील यांनी या घटनेची माहिती दहीहंडा पोलीस स्टेशनला दिली. एका अनोळखी इसमाचा मृतदेह लटकलेल्या स्थितीत असून लोकांनी इथे गर्दी केली आहे अशी माहिती नंदू पाटील यांनी दिल्यानंतर पोलीस हेडकॉन्स्टेबल अरूण घोरमोडे व पोलीस कॉन्स्टेबल प्रफुल्ल दिंडोकर तात्काळ पुंडा गावात पोहोचले. या दोन कर्मचाऱ्यांनी मृतदेहाची बारकाईने तपासणी केली असता हा घातपात असल्याचे त्यांना दिसले, कारण मृतकाच्या गळ्यावर दोरीचे व्रण होते. तसेच मोटरसायकलवरून पाय घासत आल्यामुळे बोटांना जखमा झाल्या होत्या. या माहितीवरून हा घातपात असल्याचा संशय बळवल्यामुळे हेडकॉन्स्टेबल अरूण घोरमोडे यांनी पोलीस स्टेशनला फोन करून ठाणेदार सुरेंद्र राऊत यांना हा प्रकार सांगितला. या घटनेची माहिती मिळताच ठाणेदार सुरेंद्र राऊत, ए. एस. आय. शिल्पा धुर्वे, अनिल भाडे, निलेश गावंडे, रामेश्वर भगत, मनिष बाकोडे, निलेश देशमुख, भारती ठाकूर हे तातडीने घटनास्थळावर पोहोचले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह ओळखण्यासाठी तपास सुरू केला, मात्र काही वेळातच मृतदेहाची ओळख पटली. मृतक सचिन धमराव बांगर हा अकोला जिल्ह्यातील पातुर तालुक्यात येणाऱ्या पास्ट्रल गावचा रहिवासी आहे अशी माहिती प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी तपासाचे चक्र अधिक गतिमान केले. चौकशी दरम्यान सचिन या गावात कसा आला? याचा शोध घेतला असता त्याची पत्नी कांचन ही गेल्या काही महिन्यापासून माहेरी रहात होती. तिला भेटण्यासाठी सचिन हा अधून-मधून गावात यायचा. यानंतर ठाणेदार सुरेंद्र राऊत यांनी मृतकाची पत्नी कांचनची चौकशी सुरू केली. पोलिसांसमोर काचन ही जास्त वेळ खोट बोलू शकली नाही, तिने आपल्या कृत्याची कबुली दिली. तिने पोलिसांना सांगितले की, सचिन हा दारू पिऊन गावात धिंगाणा घालत असल्यामुळे त्याचा कायमचा काटा काढण्यासाठी दिगंबर माळवे या शेजाऱ्याची मदत घेतली. सचिनचा खून करण्याबाबत तीस हजार रूपयात सौदा पक्का झाला. सचिनचा खून केल्यानंतर दिगंबर माळवे याला ३० हजार रूपये मिळणार होते. ठरल्याप्रमाणे दि. २७ डिसेंबर २२ रोजी सचिन बांगर हा दारू पिऊन गावात आला. त्याने दारूच्या नशेत शिवीगाळ करणे सुरू केले. कांचन घरातून हा सर्व प्रकार बघत होती. काही वेळानंतर सचिन घरात येणारच याची तिला माहिती होती म्हणून तिने दिगंबरला फोन करून याबाबत अवगत केले होते. रात्री 'उशिरा सचिन हा पत्नी कांचनकडे पोचला. काचन आणि दिगंबर दोघेही तयारीतच होते. मध्यरात्र झाल्यानंतर दोघांनी त्याचा गेम केला अशी माहिती पोलिसांना प्राप्त झाल्यानंतर दहीहंडा पोलिसांनी याप्रकरणी कलम ३०२, २०१(३४) नुसार गुन्हा दाखल करून मृतकाची पत्नी कांचन तसेच तिला मदत करणारा तिचा शेजारी दिगंबर व त्याचा १५ वर्षीय अल्पवयीन मुलगा या तिघांना अटक केली. या प्रकरणातील आरोपी अवघ्या २४ तासात पोलिसांनी शोधून काढले. यासंदर्भात अशी माहितीही समोर आली की, यातील मृतक सचिन बांगर हा गावात आल्यानंतर आरोपी दिगंबरला म्हणायचा की, मी तुझ्या मुलीला विकतो, ती सुंदर आहे. कांचनला ही बाब माहित झाल्यानंतर कांचन आणि दिगंबर दोघेही सचिन बांगरवर बारीक लक्ष ठेवून होते. सचिनचा कायमचा अडथळा दूर करण्यासाठी दिगंबर लगेच तयार झाला. त्यातच त्याला तीस हजार रूपये देण्याचे कांचनने कबूल केल्यामुळे दिगंबरने हे काम स्वीकारले. कांचन आणि दिगंबर यांना अटक करण्यात आल्यामुळे कांचनच्या दोन्ही मुली तिच्या आजीकडे रहात आहेत. आई-वडीलांचे छत्र हरपलेल्या या चिमुकल्यांच्या नशिबी असे दिवस आल्यामुळे गावकऱ्यांनासुद्धा अश्रू आवरता आले नाहीत, या घटनेमुळे चांगल्या कुटुंबाची राख रांगोळी झाली.

## ५० टक्के अनुदानावर मिळणार सोयाबीन

लातूर : जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून सोयाबीन स्पायरल सेपरेटर व सोयाबीन टोकण यंत्र ५० टक्के अनुदानावर डीबीटी तत्वावर देण्यात येणार आहेत. यापूर्वी या औजारांसाठी पंचायत समितीस्तरावर अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले होते. मात्र, भौतिक साध्याप्रमाणे अपेक्षित अर्ज प्राप्त न आल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून सोयाबीन स्पायरल सेपरेटर व सोयाबीन टोकण यंत्रांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी १० फेब्रुवारी २०२३ पर्यंत संबंधित पंचायत समितीस्तरावर आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे कृषि विकास अधिकारी सुभाष चोले यांनी केले आहे.या योजनेमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व महिला यांना प्राधान्य राहील. इच्छुक शेतकऱ्यांनी स्वतःचा सातबारा, आठ अ, आधार कार्ड, बँक पासबुकाच्या पहिल्या पानाचे झेरॉक्स, लाभार्थी अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे असल्यास जातीचे प्रमाणपत्र व अपंग लाभार्थ्यांसाठी अपंगत्वाच्या दाखल्याच्या झेरॉक्स प्रतींसह संबंधित पंचायत समितीकडे अर्ज करावेत. लाभार्थ्याची निवड केल्यानंतर शेतकऱ्यांनी १ महिन्याच्या आत खुल्या बाजारातून अधिकृत विक्रेत्याकडून आपल्या पंसतीच्या औजाराची खरेदी करावी लागेल.

06 TO 12 FEBRUARY 2023 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 2/4/2023 9:56 PM Page 1



# महात्मा गांधी हेच आजचे युथ आयकॉन -एम.राजकुमार




## गांधीतीर्थ येथून ग्राम संवाद सायकल यात्रेस प्रारंभ

**जळगाव/प्रतिनिधी**

गांधीजींच्या जीवन चरित्राकडे व विचारांकडे डोळसपणे पाहिल्यास आजच्या तरुणांसमोर महात्मा गांधी यांच्यासारखा दुसरा युथ आयकॉन नाही. त्यांच्या अंगी असलेला कणखरपणा व लोकनेत्यासाठीची योजकता आजच्या पिढीने अनुकरण करावी अशी आहे. असे मौलीक विचार जिल्हा पालीस अधीक्षक एम.राजकुमार यांनी व्यक्त केले. महात्मा गांधी पुण्यतिथीच्या औचित्याने गांधी रिसर्च फाऊंडेशनद्वारा आयोजित ग्राम संवाद सायकल यात्रे'च्या शुभारंगप्रसंगी उपस्थितांशी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ गांधीयन अब्दुलभाई, गांधी रिसर्च फाऊंडेशनचे संचालक अशोक जैन, डीन गीता धर्मपाल उपस्थित होते. सकाळी सात वाजता गांधी तीर्थच्या ॲम्फी थिएटर येथे महात्मा गांधीजींच्या पुण्यतिथीनिमित्त सर्व उपस्थितांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधीजींच्या पुतळ्यास पुष्पार्पण करण्यात आले. गांधी रिसर्च फाऊंडेशनचे सहकारी सुरेश पाटील यांनी सर्वधर्म प्रार्थना व रघुपति राघव राजाराम पतित पावन सीताराम हे भजन सादर केले. गांधी रिसर्च फाऊंडेशनचे सहकारी डॉ. अश्विन झाला यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. गांधी रिसर्च फाउंडेशनचे संचालक तथा जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोकभाऊ जैन यांनी उपस्थितांना स्वच्छता व सद् भावना शपथ दिली. उपस्थितांशी संवाद साधताना जिल्हा पोलीस अधीक्षक एम. राजकुमार पुढे म्हणाले की, मला शालेय जीवनात महात्मा गांधीजींबद्दल अतिशय त्रोटक माहिती होती. मात्र महाविद्यालयीन जीवनात त्यांच्या जीवनाबद्दल विस्तारानं अभ्यास केल्यानंतर त्यांची महत्ता कळली. दक्षिण आफ्रिकेसारख्या नवख्या देशात त्याकाळी जाऊन काम करणे व तेथील प्रशासनाला अन्यायाला जाब विचारण्याचा कणखरपणा मला विशेष भावला. स्वातंत्र्य संग्रामतील त्यांचे योगदान मोलाचे होते. संवाद साधनांची मर्यादा असलेल्या त्याकाळात त्यांनी केलेली आंदोलने यशस्वी ठरली कारण हि आंदोलने वाऱ्यासारखी देशभर पसरत होती व त्यावर गांधीजींचे संपूर्ण नियंत्रण होते. त्यांच्या ठायी असलेले हे गुण अचंबित करणारे होते. गांधीतीर्थ येथील म्युझियमच्या माध्यमातून त्यांचे कार्य आजच्या युवापिढीपर्यंत त्यांच्या भाषेत व आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे गांधी फाऊंडेशन पोहोचवत आहे ही चांगली बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमा नंतर लगेचच जिल्हा पोलीस अधीक्षक एम. राजकुमार यांच्याहस्ते हिरवा झेंडा दाखवून सायकल रॅलीस प्रारंभ करण्यात आला. यावेळी स्वतः राजकुमार आणि अशोक जैन यांनी काही अंतर स्वतः सायकल चालवून सहभागींना प्रोत्साहन दिले. तेरा दिवस चालणाऱ्या या यात्रेत एकूण ३५ सायकल यात्रींचा सहभाग आहे.जळगाव जिल्ह्याच्या दक्षिण-पश्चिम भागातील जळगाव, एरंडोल, पारोळा, भडगाव, चाळीसगाव, पाचोरा, जामनेर तालुक्यातून हि यात्रा मार्गस्थ होणार आहे. सुमारे ३५० कि.मी.चे एकूण अंतर असेल. या यात्रेच्या माध्यमातून एक लाख विद्यार्थी व नागरिकांशी संवाद साधला जाईल. या सायकल यात्रेत विविध राज्यातून येणारे व स्थानिक अशा ३० जणांचा सहभाग आहे. ९ वर्षाचा नीर झाला, ७८ वर्षीय अब्दुलभाई, अमेरिकेतील मारिया व बंगलोर येथील ३ विद्यार्थ्यांचा यात्रेत समावेश आहे. यात्रेत दररोज दोन कार्यक्रम शाळा, महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने विशेष स्वरुपाने बनविलेली ऐतिहासिक प्रदर्शनी प्रत्येक ठिकाणी लावली जाणार आहे. तर रात्री मुक्कामाच्या ठिकाणी गावकऱ्यांसाठी जाहीर कार्यक्रम नियोजीत आहेत यात निरोगी व सशक्त समाजाच्या निर्मितीच्या उद्देशाने या यात्रेत प्रबोधन करण्यात येणार आहे. प्रश्नमंजुषा, व्याख्यान, खेळ, पथनाट्य व पपेट शोचा वापर करण्यात येणार आहे. प्रत्येक ठिकाणी उपस्थितांना याप्रसंगी स्वच्छता व सद् भावना शपथ देण्यात येईल. विद्यार्थी व नागरिकांनी सहभाग देऊन सहकार्य करावे असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

# जीवघेण्या काजळीपासून सोलापूरकरांची सुटका करा; महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सोलापूर विकास मंचची पुराव्यानिशी तक्रार दाखल

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



जिवघेण्या प्रदुषणकारी काजळीमुळे सोलापूरकरांच्या आरोग्यास अत्यंत धोकादायक अशी स्थिती निर्माण झाली असून येणाऱ्या काळात भोपळ गॅस दुर्घटनेपेक्षा अत्यंत भयंकर घटना सोलापूरात घडण्याची वाट न पाहता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने तात्काळ उपाययोजना करण्यात यावे अशी मागणी सोलापूर विकास मंचच्या सदस्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ सोलापूर उपप्रादेशिक अधिकारी श्री निखिल मोरे यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली. गेल्या १५ वर्षापासून जुळे सोलापूर परिसरातील नागरिकांना प्रती दिन ४० सिगरेट इतक्या धोकादायक रासायनिक काळजीयुक्त प्राणवायुमुळे फुफ्फुसांचे आजार, दुषित पाण्यामुळे किडणीचे विकार तथा कॅन्सर अश्या भयंकर रोगराईचे भोग बालकांनसहित प्रौढ नागरिकांना सोसायला लागत आहेत. सोलापूरकरांच्या वतीने काही दिवसांपूर्वी प्रदुषणकारी आणि घातक काजळी विरोधात ऑनलाईन सर्व्हे विकास मंच तर्फे घेण्यात आला, त्यास सोलापूरकरांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवत काजळीमुळे होणाऱ्या दुष्परिणामांवर आतापर्यंत ४२४ जणांनी संतप्त प्रतिक्रिया नोंदवल्या. जीवघेणी आणि प्रदुषणकारी काजळीचे सॅम्पलसहित दस्तऐवज सोलापूर विकास मंचच्या सदस्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सुपूर्द करण्यात आले. सदर पुराव्यांचा अभ्यास करुन प्रदुषण करणार्यांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी सोलापूर विकास मंचच्या वतीने करण्यात आली. मागील तीन महिन्यांपासून जुळे सोलापूरकर कोरडा खोकला, सर्दी आणि खोकल्याने हैराण असुन महानगरपालिका आरोग्य केंद्र तथा सिव्हिल हॉस्पिटल मध्ये खोकल्याच्या औषधांची प्रचंड मागणी होत आहे, काही दिवसांपूर्वी तर ह्या औषधांचा देखील तुटवडा निर्माण झाल्याचे चित्र निर्माण झाले होते.

जीवघेणी काजळी श्वासाद्वारे फुफ्फुसात पोहोचतात नंतर रक्तातात मिसळून शरिराच्या सगळ्या अवयवां मध्ये पोहचुन दिर्घकाळ राहुन अवयव निकामी करतात हे अभ्यासाअंती सिध्द झाले आहे. प्रदुषणारी आणि जीवघेण्या काजळी पासुन सोलापूरकरांची सुटका करावी तसेच रस्त्याच्या कडेला रेल्वे रुळा लगत मळी ची दुर्गंधी रेल्वे प्रवाश्यांना व रस्त्या वरील लोकांना नाक बंद करून जावे लागते, अश्या कैफियतपर तक्रार सोलापूर विकास मंचच्या सदस्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ सोलापूर उपप्रादेशिक अधिकारी श्री निखिल मोरे यांच्या कडे केली. ह्यावेळी सोलापूर विकास मंचचे सदस्य केतनभाई शहा, मनोज क्षीरसागर, सुहास भोसले, आनंद पाटील, विजय कुंदन जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

# शिक्षण संचलित शिक्षण संस्थेच्या सरचिटणीसपदी विशाल कुलकर्णी यांची निवड

**वाडा/प्रतिनिधी**



गुरुवर्य सुरेश पांडुरंग कुलकर्णी यांनी अतिशय खडतर परिस्थितीत ऑक्टोबर १९६८ साली स्थापन केलेल्या शिक्षक संचालित शिक्षण संस्थेच्या संचालक शिक्षक विशाल कुलकर्णी यांची निवड कारण्यात आली असून अतिशय होतकरू तरुणाच्या हाती दिल्याने संस्थेला त्यांच्याकडून नवीन उभारी मिळण्याच्या आशा वाढल्या आहेत. शिक्षक संचालित शिक्षण संस्थेच्या वाडा, मालवाडा व दापचरी येथे माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा आणि महाविद्यालय असून पाच वसतिगृह देखील आहेत. या शाळेना गोर-गरीब तसेच बहुतांश आदिवासी समाजातील मुले शिक्षण घेत आहेत. या मुलांसाठी नवीन योजना तयार करून त्यांच्या उज्वल प्रयत्न असून संस्थेत काम करत असताना विद्यार्थी हित, त्यांची शैक्षणिक प्रगती यावरभर देत संस्थेत आपली सेवा देणाऱ्या प्रत्येक घटकाला संनमानाने वागणूक आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून केला जाणार आहे. तसेच भविष्यात गोर गरिबांसाठी इंग्रजी माध्यमाची शाळा आणि कृषिमहाविद्यालय आणि बहुविध कामे करण्याचा त्यांनी मानस वेक्त केला आहे. ज्या संस्थेची स्थापना गुरुवर्य सुरेश पांडुरंग कुलकर्णी यांनी अतिशय खडतर परिस्थितीत केली आहे त्या संस्थेची सेवा माझे वडील स्वर्गीय सुरेश कुलकर्णी यांनी केली त्याच संस्थेवर मला सरचिटणीस म्हणून काम करण्याची संधी मिळाली हे माझे भाग्य आहे. याबद्दल सर्व मान्यवरांचे मनापासून आभार. संस्थेच्या अध्यक्षांनी आणि सदस्यांनी सोपवलेली जबाबदारी मी पूर्ण निष्ठेने पार पाडेल याची ग्वाही देतो, असे वाडा शिक्षक संचलित शिक्षण संस्थेचे सरचिटणीस विशाल कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.

# अखिल भारतीय सोमवंशी आर्य क्षत्रिय समाजाच्या राज्य संघटन समितीच्या सचिवपदी प्रशांत रघुनाथराव साळुंके यांची निवड!

**देवणी/प्रतिनिधी**

अखिल भारतीय सोमवंशी आर्य क्षत्रिय समाजाच्या राज्य संघटन समिती सचिवपदी प्रशांत रघुनाथराव साळुंके यांची निवड करण्यात आली आहे.सदर नियुक्ती पत्राव्दारे अखिल भारतीय सोमवंशी आर्य क्षत्रिय समाजाचे अध्यक्ष प्रमोद सोपानराव बागलाणे यांनी निवड केली आहे. अखिल भारतीय सोमवंशी आर्य क्षत्रिय समाजाचे अध्यक्ष प्रमोद सोपानराव बागलाणे यांनी सांगितले. प्रशांत साळुंके एक सामाजिक अभ्यासूवृत्तीचा असल्याने त्यांची सदर नियुक्ती आपल्या कोअर कमिटीव्दारे करण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले त्यांना पुठील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या आहेत. या निवडी बद्दल विजय उबाळे, प्रविण भालेराव, अंबादास दिल्लीकर, त्र्यंबक सोनवळकर, राम सोनवळकर, भिकाजी वाघमारे, रामहारी कांबळे, सुनिल साळुंके, सतिश साळुंके, शामसुंदर साळुंके, संतोष वाघमारे, अजय ठालपवार, विठ्ठल वाघमारे, ज्ञानोबा वाघमारे, अशोक साळुंके, सौ.सुषमा प्रशांत साळुंके, शरद साळुंके, प्रणव साळुंके, सागर उमरानकर, विजय देशमुख, पंकज कुलकर्णी, राजकुमार सोनी, बाळकृष्ण डांगे, अंकुश कवडे आदींनी अभिनंदन केले आहे.



# जैन इरिगेशनच्या सर्व आस्थापनांमध्ये महात्मा गांधी स्मृतिदिनी श्रद्धांजली



**जळगाव/प्रतिनिधी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना ७५ व्या पुण्यतिथी निमित्त जैन इरिगेशनच्या सर्व आस्थापनांमध्ये अभिवादन करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. गांधीजींनी दिलेला अहिंसेचा संदेश प्रत्येकाच्या मनात आहे. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त हुतात्मा दिन ही पाळला जातो. स्वदेशी आणि स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारुन देशाला आत्मनिर्भर करण्याची प्रेरणा देणाऱ्या महात्मा गांधीजींच्या जीवन चरित्राचा तरुणांना, येणाऱ्या पिढीला अभ्यास करता यावा यासाठी श्रद्धेय मोठेभाऊ भवरलालजी जैन यांनी गांधीतीर्थची निर्मिती केली. गांधी स्मृतिदिनी जैन इरिगेशनच्या सहकाऱ्यांनी त्यांना अभिवादन केले. स्वातंत्र्याच्या अमृत वर्षाच्या काळात ग्रामीण विकास, स्वच्छता स्वदेशी, आणि स्वभाषा हे विचार रुजणे महत्त्वाचे ठरते. कंपनीच्या मुख्यालयासह भारतातील सर्व कार्यालयांमध्ये सकाळी ११.०० वाजता आणि सायंकाळी ५.१७ वाजता सर्व सहकाऱ्यांनी स्तब्ध उभे राहून राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांना श्रद्धांजली अर्पण केली.

वकील : ॲड. दर्शना त्रिपाठी

**जाहीर नोटीस**

**वसई येथील मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साहेब ह्यांच्या न्यायालयात**

चौकशी अर्ज क्र. : १६/२०२३
पु.ता. ०४/०२/२०२३

**श्री. उमेश चंद्रकांत शाह** .... **अर्जदार**

**विरुद्ध**

**मा. निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी**
**बोळींज विभाग** .... **सामनेवाले**

ज्याअर्थी वरील अर्जदारांच्या आईचा **धिरजबाला चंद्रकांत शाह** दि. २६/०५/२०१७ रोजी मृत्यू झालेला आहे. ज्याअर्थी सदर मृत्यूची नोंदणी करण्याबाबत आदेश होणेकामी मे. ज्युडीशियल प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, वसई कोर्ट येथे चौ. अर्ज क्रमांक १६/२०२३ दाखल केला आहे. तरी सदरकामी ज्याकोणी इसमांची कोणतीही हरकत असेल तर त्यांनी या न्यायालयात सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत लेखी हरकत नोंदवावी. सदरहू मृत्यूची नोंदणीबाबत कोणतीही हरकत न आल्यास योग्य ते पुरावे कागदपत्र घेऊन धिरजबाला चंद्रकांत शाह हिचा मृत्यूची नोंदणी करण्याबाबत आदेश देण्यात येईल, ह्याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०४/०१/२०२३रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

**सही/-**
**लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय क.स्तर, वसई**

## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'ई' नालासोपारा पश्चिम, मुख्य कर्यालय-विरार**

**दुरध्वनी : १२२५०-२४०२१७९/२४०२५६३**

### जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'ई' कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | निळेमोरे-३ | NL26/22/46 | ४३२४ | ताराबाई सी. वाघमारे | आरती भरत भट्ट |
| २. | निळेमोरे-१ | NL24/57/34 | ४३५७ | एम.आर. शिंदे | सलीम मुन्शी मन्सुरी |
| ३. | निळेमोरे-४ | NL27/84/16 | ४३६० | लहारचंद एन. देढीया | परेश जसुभाई गारडीया |
| ४. | निळेमोरे-३ | NL26/2/8 | ४३८३ | शेख मुझ्झफर अली सी शेख | रामचंद्र घ. भगत |
| ५. | निळेमोरे-३ | NL26/22/22 | ४४३६ | राजेंद्र हरिकृष्ण शर्मा | प्रकाशसिंह गणपतसिंह राजपुरोहित / विक्रमसिंह गणपतसिंह राजपुरोहित |
| ६. | निळेमोरे-३ | NL26/22/26 | ४४३७ | राजेंद्र हरिकृष्ण शर्मा | प्रकाशसिंह गणपतसिंह राजपुरोहित / विक्रमसिंह गणपतसिंह राजपुरोहित |
| ७. | निळेमोरे-३ | NL26/22/66 | ४४४३ | मोहम्मद आर. कापडीया | राजेश प्रेमजी सावला |
| ८. | निळेमोरे-४ | NL27/20/7 | ४४६२ | रामशेट्टी विठ्ठल राठोड व इतर २ | गणेश रामचंद्र निपाणे व मंगल गणेश निपाणे |
| ९. | निळेमोरे-३ | NL26/17/32 | ४४७७ | हरकचंद ला कोरीया/प्रविण कोरीया | अजय परमजित सिंह व छाया अजय सिंह |
| १०. | निळेमोरे-२ | NL25/28/25 | ४५२० | शशिकांत याज्ञीन | रविंद्र कौर हरज्योतसिंग मथारू |
| ११. | निळेमोरे-२ | NL25/71/82 | ४५३१ | मनसुखानी बिल्डर्स | खिमाराम इन्द्राजी चौधरी व भवरदेवी मिथाराम चौधरी |
| १२. | निळेमोरे-२ | NL25/64/21 | ४५४७ | जी.डी. निर्मलकुमार | लक्ष्मीकांत रामजीवन पांडे व रविकांत रामजीवन पांडे |
| १३. | निळेमोरे-४ | NL27/36/30 | ४११६ | विरेंद्र नारायण एस. सिंह | रवीशंकर वीरेंद्र नारायण सिंह |
| १४. | निळेमोरे-४ | NL27/84/30 | ४६२४ | गणेश काना मिजीयत्तर | चंपाबेन गणेश मझियातर |
| १५. | निळेमोरे-१ | NL24/98/13 | ४५५५ | यश अपार्ट., | निनाद तानाजी लोहार व नम्रता तानाजी लोहार |
| १६. | निळेमोरे-४ | NL27/83/14 | ४६७८ | जागृती जगदिश मेहता व जगदिश मेहता | किशोर नामदेव कांबळे व शैला किशोर कांबळे |
| १७. | निळेमोरे-४ | NL27/109/5 | ४६७५ | कल्पीता तळपदे | अजय दुखराज तिवारी व माला अजय तिवारी |
| १८. | निळेमोरे-१ | NL24/39/24 | ४६८५ | चंद्रकांत हरी कोळंबे | त्रिलोकीनाथ राधेश्याम गुप्ता |
| १९. | निळेमोरे-१ | NL24/39/23 | ४६८७ | सय्यद इलीयाज अली | त्रिलोकीनाथ राधेश्याम गुप्ता |
| २०. | निळेमोरे-४ | NL27/117/8 | ४७२४ | शिवाजी आर. सुसतकर | भानुदास जनार्दन सरक |

**जावक क्र.: वविशम/कवि/१९४/२०२२-२३**
**दिनांक : २७//०१/२०२३**

**सही/-**
**(मनोज वनमाळी)**
**प्र.सहा.आयुक्त**
**प्रभाग समिती (ई) नालासोपारा**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

06 TO 12 FEBRUARY 2023 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 2/4/2023 10:01 PM Page 1



# अंधभक्तांना शिकवलं... शिकलेल्यानी करून दाखवलं!

कपाळावरील कर्माच्या रेषेवर विधात्यानं रेखाटलेल माणसाचं भविष्य त्याने दगडावर कपाळ आपटून डोकं फोडून घेतलं तरी ते त्याला बदलता येत नाही . त्यामुळे दगडाला देव मानायचं कि तो दगड आहे हे वास्तव मान्य करायचं याचा विचार अंधभक्तांनी करायला हवा आहे. सध्याचे युग हे विज्ञान युग आहे. त्यामुळे प्रत्येक गोष्ट विज्ञानाच्या कसोटीवर तपासली जाते. असे असताना या देशात २०१४ पासून व्यक्ती माहात्म्य वाढलेलं आहे. एखाद्या माणसाला देवपण देऊन तो सांगेल ती पूर्व दिशा असे समजायची आणि त्या माणसाच्या मागे फरफटत जायचे हे खरे तर अशिक्षितपणाचे लक्षण आहे आणि महाराष्ट्र हा सुसंस्कृत आणि सुशिक्षित विचारवंतांचा आहे. त्यामुळे इथे अंधभक्तीला फारसे स्थान नाही. विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीतून हेच बघायला मिळाले आहे. तसे पाहता महाविकास आघाडीमध्ये फारशी एकी दिसत नाही तरीही महाविकास आघाडीचे ३ उमेदवार निवडून आले. तर भाजपचा त्यांच्या बालेकिल्ल्यात दारुण पराभव झाला. शिक्षक आणि पदवीधर मतदार संघातील सुशिक्षित मतदारांनी डोळसपणे मतदान करून आपले प्रतिनिधी निवडले. कोकणात एका जागेवर भाजपला यश आले. तेही शेकापवर असलेल्या रागामुळे तिथल्या मतदारांनी निगेटिव्ह मतदान केले. कदाचित २०२४ साली सुद्धा असाच क्रांतिकारी निकाल बघायला मिळेल. कारण देवाधर्माच्या नावाने मते मागण्याचा आणि आपला धर्म संकटात असल्याचा खोटा बनाव करून लोकांना आपल्याकडे खेचून घेण्याचे प्रकार आता फार काळ चालणार नाहीत . आणि शाहू फुले आंबेडकरांच्या महाराष्ट्रात तर असले प्रकार आता कुणीही खपवून घेणार नाहीत. विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदार संघातील सुशिक्षित मतदारांनी दाखवून दिले कि माणसाच्या दैनंदिनी जीवनात जात पात देव धर्म याना फारसे महत्व नाही. आणि या भारतात सर्व धर्म सुरक्षित आहेत कुठलाही धर्म संकटात आलेला नाही. घटनेने दिलेले धार्मिक स्वातंत्र्य प्रत्येक धर्माचा माणूस सुख समाधानाने उपभोगतोय. त्यामुळे हिंदूंमुळे मुस्लिमाचा धर्म संकटात आला आहे आणि मुस्लिमांमुळे हिंदूंचा धर्म संकटात आला आहे या बाताव्ण्याना आता कुणीही भुलत नाही. आणि म्हणूनच निवडणुकांमध्ये जाती धर्माचा प्रचार करून निवडणूक जिंकण्याचे दिवस संपले आहेत. आणि ही गोष्ट कट्टरपंथीयांच्याही लक्षात आलेली आहे. विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदार संघातील सुशिक्षित मतदारांचे अनेक प्रश्न आहेत पण भाजप सरकारने त्यांच्या मूळ प्रश्नांकडे लक्ष देण्या ऐवजी त्यांचा धर्म त्यांची जात यावर अधिक भर दिला. जुन्या पेन्शनचा प्रश्न तसाच भिजत पडला आहे तो सोडवण्या ऐवजी उपमुख्यमंत्र्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळेच त्यांच्या बालेकिल्ल्यात म्हणजे नागपूर शिक्षक मतदार संघात त्यांच्या उमेदवाराचा पराभव झाला. या पराभवातून भाजपने धडा घेणे आवश्यक आहे, पण तसे झाले नाही. नाशिक शिक्षक मतदार संघात भाजपच्या इशाऱ्यावरूनच सुधीर तांबे याने पक्षाशी गद्दारी केली आणि पक्षाने दिलेली उमेदवारी झुगारून मुलाला अपक्ष म्हणून उभे केले हे सर्व अगोदरच ठरलेले होते. त्यामुळेच भाजपच्या छुप्या पाठिंब्यावर सत्यजीत तांबे निवडून आले, आता हे बाप बेटे कुठल्याही पक्षगात जावोत गद्दार अशीच त्यांची ओळख राहील. कोकण शिक्षक मतदार संघात ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्यासाठी भाजपने खूप पैसे वाटल्याची चर्चा आहे, त्यांनी शिक्षण संस्थेच्या संचालकांना १ लाख, मुख्याध्यापकांना २५ हजार तर शिक्षकांना ५ हजार वाटल्याचे बोलले जाते, तर शेकापचा बाळाराम पाटलांनी सुद्धा १० कोटी वाटल्याचा आरोप केला जातोय. आता शिक्षक किंवा शिक्षण क्षेत्राशी संबंधित असलेले लोकच जर अशा प्रकारे पैसे घेऊन मतदान करायला लागले तर शिक्षण क्षेत्रातील लोकांच्या व्यथा ते कशा काय विधान परिषदेत मांडू शकतील? भाजपच्या जातीयवादाला लोक वैतागले आहेत, त्यांचा जनाधार घसरू लागलंय. त्यामुळे त्यांना दोनच गोष्टी तारू शकतात, एकतर हिंदुत्ववाद आणि दुसरा पैशाचे वाटप! हिंदुत्ववाद बद्दल बोलायचे झाल्यास मुसलमान जसे इस्लाम खत्रेमे है अशा घोषणा देऊन गरीब मुस्लिम तरुणांना जिहादसाठी तयार करीत असतात तसे आता हिंदुत्ववादी सुद्धा हिंदू धर्माला मुस्लिम समाजापासून धोका असल्याची भीती दाखवून भोळ्या भाबड्या हिंदूं समाजाच्या मनात मुस्लिम द्वेषाचे विष पसरवत आहेत. त्यामुळं हिंदू समाजातील काही गोरगरीब अशिक्षित मतदार भाजपच्या मागे फरफटत जात आहे. कारण असे केले तरच राजकारणात भाजपचा टिकाव लागू शकतो ही वस्तुस्थिती आहे. त्यातच मोदींचे भक्तही आता कमी होत आहेत, अशावेळी मोदींना देव्हाऱ्यात बसवण्याची कसरत सुरू आहे, तर दुसरीकडे पैशाचा वापर करून निवडणुका जिंकण्याची जुनी पद्धत सुद्धा वापरली जात आहे. विधान परिषद शिक्षक आणि पदवीधर मतदार संघात काही ठिकाणी असाच प्रकार बघायला मिळाला, पण कोकण सोडून इतर ठिकाणी धर्म आणि पैशाची मात्र चालली नाही, पण कोकणात मात्र ज्ञानेश्वर म्हात्रेसाठी टाकलेले ५४ कोटी वसूल झाले, पण इतर ठिकाणच्या वैचारिक दृष्ट्या परिपक्व असलेल्या आणि जाती धर्माच्या पलीकडे बघणाऱ्या मतदारांनी भाजपला अद्दल घडवून दाखवली आणि आपल्या मनासारखं करून दाखवल!

# माजी उप संरक्षण मंत्र्यांना फाशीची शिक्षा, नेमके प्रकरण काय?



**दिशायन**

मध्य पूर्वेकडील देश नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. सध्या इराण हा चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे, कारण इराणच्या माजी उप संरक्षण मंत्र्यांना फाशीची शिक्षा जाहिर करण्यात आली आहे, नेमके प्रकरण काय ते या लेखातून समजून घ्या.

एखाद्या बड्या राजकीय नेत्याला मोठी तुरुंगवासाची किंवा फाशीची शिक्षा झाली असे आपण भारतात कधी ऐकले आहे का? उलट कोणताही नेता, कोणत्याही मोठ्या गंभीर प्रकरणात दोषी असला तरी झाकली मुठ सव्वा लाखाची असेत आणि इतर सर्व नेते याला अळी मिळी गुपचिळी म्हणत साथ देत असतात. मात्र इराणचे राजकीय नेते आणि माजी सरकारी अधिकारी अलिरेझा अकबरी यांना ब्रिटनसाठी हेरगिरी केल्याप्रकरणी दोषी ठरवत, फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे, इराणी वृत्तसंस्था तस्नीमच्या हवाल्यानं रॉयटर्सनं याबाबतचं वृत्त दिले आहे. तर, यावर ब्रिटनच्या परराष्ट्र मंत्रालयाने अकबरी यांना सोडवण्याचे आवाहन केले आहे.

**कोण आहेत अलिरेझा अकबरी?**

अलिरेझा अकबरी इराणमधील एक राजकीय नेते आहेत. इराणमधील एक मवाळ राजकारणी म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या राजकीय कारकीर्दीत त्यांनी अनेकदा पाश्चात्य देशांशी संवाद साधताना मध्यस्थ म्हणून काम केलं आहे. इराण-इराक युद्धादरम्यानही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. यावेळी त्यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या निरीक्षकांबरोबरही काम केले होते. अकबरी हे १९९७ ते २००५ या काळात इराणचे अध्यक्ष मोहम्मद खतामी यांच्या सरकारमध्ये उपसंरक्षण मंत्री होते. त्यावेळी, अकबरी यांनी इराण आण्विक कराराचे समर्थक केले होते. २०१५ मध्ये पाश्चात्य देश आणि तेहरान यांच्यात हा करार झाला होता. इराणची अण्वस्त्रे विकसित करण्याची क्षमता मर्यादित करण्यासाठी या करारांवर स्वाक्षरी करण्यात आली होती. याबदल्यात, पाश्चात्य देशांनी इराणवरील काही व्यापारी निर्बंध हटवण्यास सहमती दर्शविली होती. याबरोबरच इतर देशांना इराणमधील आण्विक साइट्सची तपासणी करण्याची द्यावी, अशी भूमिका त्यांनी मांडली होती. यामुळे पाश्चात्य देशांशी भविष्यातील संबंध मजबूत होण्यास मदत होईल, असे त्यांचे मत होते.

**अकबरी यांच्यावर काय आरोप आहेत?**

बीबीसीने दिलेल्या वृत्तानुसार, आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांचे अनेक देशात वास्तव्य होते. पुढे ते ब्रिटनमध्ये स्थायिक झाले. २०१९ पासून ते सार्वजनिक जिवनातही फारसे दिसले नाहीत. त्यांनी ब्रिटनमध्ये अनेक सरकारी अधिकाऱ्यांची भेट घेतल्याच्या वृत्तानंतर त्यांनी इराणची संवेदनशील माहिती ब्रिटनला दिल्याचा आरोप इराणकडून करण्यात आला. बीबीसीच्या म्हणण्यानुसार, अकबरी यांना इराणच्या एका वरिष्ठ राजनैतिक अधिकाऱ्याने भेटण्यासाठी इराणला बोलावले होते. अकबरी तिथे गेल्यावर त्यांच्यावर ब्रिटनची गुप्तचर एजन्सी एमआय ६'साठी काम केल्याचा आरोप करत त्यांना अटक करण्यात आली. याप्रकरणी त्यांना इराणने फाशीची शिक्षाही सुनावली आहे.

**आरोप फेटाळण्यात आले**

द गार्डियन'ने दिलेल्या वृत्तानुसार, अकबरी यांची पत्नी मरियम यांनी इराणने केलेले आरोप फेटाळून लावले आहेत. साधारण १० ते १२ वर्षापूर्वी अकरबी यांनी ब्रिटीश अधिकाऱ्यांची औपचारिक भेट घेतली होती. यावेळी अकबरी हे आपल्या पदावर होते. त्यानंतर ब्रिटनच्या अधिकाऱ्यांशी त्यांची कधीही भेट झाली नाही, ते गुप्तहेर नाहीत. इराणच्या गुप्तचर अधिकाऱ्यांनी अकबरी यांनी इस्टेट एजंटच्या घेतलेल्या भेटीचा चुकीचा अर्थ लावला आहे, अशी प्रतिक्रिया मरियम यांनी दिली आहे. विशेष म्हणजे, बीबीसी पर्शियनला अकबरी यांच्या काही ऑडिओ क्लिपही मिळाल्या आहेत. ज्यामध्ये ते इराणकडून कथितपणे छळ करण्यात आला आणि कबुलीजबाब देण्यास भाग पाडल्याबद्दल बोलत आहेत.

**ब्रिटनची भूमिका काय?**

ब्रिटनच्या परराष्ट्र कार्यालयाने एक निवेदन जारी करत अलिरेझा अकबरी यांना सोडण्याचे आवाहन इराण सरकारला केले आहे. 'हे एका क्रूर राजवटीचं राजकीय कृत्य आहे. या प्रकरणामध्ये मानवी जीवाची पूर्णपणे अवहेलना करण्यात आली आहे', असे ब्रिटनने या निवेदनात म्हटले आहे. तसेच 'आम्ही अकबरी यांच्या कुटुंबियांच्या पाठिशी असून वारंवार इराण सरकारकडे अकबरी यांची बाजू मांडली आहे. तसेच आम्हाला कॉन्सुलर ॲक्सेस द्यावा', अशी मागणीही या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. 'द गार्डियन'ने अकबरी यांच्या पत्नीचा हवाला देत त्यांच्याकडे ब्रिटीश नागरीकत्त्व असल्याचे म्हटले आहे. इराणमध्ये दुहेरी नागरित्त्वाला मान्यता नाही. त्यामुळे आम्ही परदेशी नागरिकांना आरोपीला भेटण्यासाठी किंवा संबंधित खटल्याला उपस्थित राहण्यासाठी परवानगी देऊ शकत नाही, अशी इराणची भूमिका आहे.

# कृषिक्षेत्रासाठी अर्थसंकल्पाची सप्तर्षी

आज केंद्र सरकारने मांडलेलं बजेट शेतकऱ्यांसाठी, सर्वसामान्यांसाठी पायाभूत सोयी सुविधा पुर्ण करण्यासाठी चांगलं बजेट आहे. असं मी म्हणेन. शेतकऱ्यांसाठी सप्तर्षी च्या माध्यमातून जर शेतकऱ्यांनी सर्व योजनांचा विनीयोग करायचा ठरवले आणि फायदा घ्यायचा ठरवला तर शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल होण्याची दाट शक्यता आहे. म्हणून शेतकऱ्यांनी याची माहिती घेऊन त्याचा उपयोग केला पाहिजे. आपण कुठे काय करू शकतो याच्याकडे लक्ष दिलं पाहिजे. यासोबतच पायाभुत सुविधांसाठी खूप मोठा पैसा सरकारने दिला आहे. पायाभूत सुविधा म्हटल्या म्हणजे त्यात रेल्वेचे जाळं, महामार्ग, पोर्ट, विमानतळे आले, त्यानंतर भुयारी बोगदे आले, ब्रिजेज आले. यामुळे दळणवळण चांगले होणार आहे. परंतू यातून रोजगार निर्मिती मोठ्याप्रमाणात आताही झालेली आहे आणि पुढेही जास्त प्रमाणात होणार आहे. पंतप्रधान आवास योजनेचा समावेश यामध्ये केला आहे. संपूर्ण भारतात पायाभूत सुविधांचे जाळे विणले जात आहे.

जलजीवन हर घर पेयजल देण्याचं जे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ पासून पाहिले आणि त्यावर त्यांनी सातत्याने काम करणे सुरू केले आहे. याविषयाचा सर्व नागरिकांना फायदा होतो आहे. हे आम्ही या क्षेत्रात असल्याने दिसून येतो आहे. आणि याच भावनेतून त्यांनी या योजनेचे बजेट ६० हजार कोटींवरून ७० हजार कोटींवर नेले ही मोठी बाब आहे. यामुळे प्लास्टिक उद्योगालाही चांगले दिवस येणार आणि त्यासह शेतकऱ्यांना, नागरिकांना पेयजल मिळेल हे अधिक महत्त्वाचे वाटते. त्यासोबत शेतकऱ्यांसाठी ठिबक सिंचन सारख्या विविध योजनांना गतिमान करण्यासाठी जास्त तरतूद केली आहे.



डिजीटल ॲग्रिकल्चर ही कन्सेप्ट सरकारने आणण्यासाठी निधीची तरतूद केलेली आहे ही चांगली बाब आहे. यात आमच्या कंपनीनेसुद्धा सुरुवात केलेली आहे. ॲग्रीटेक किंवा डिजिटल इन ॲग्रिकल्चर हे शेतकरी आत्मसात करायला लागले आहेत. सध्या निवडक शेतकरी याचा उपयोग करत असून पुढील काळात ही संख्या वाढेल. यामुळे उत्पादन क्षमता वाढून भारताचे नाव या क्षेत्रात अधिक उंचीवर जाईल.

सोबतच हरित क्रांती ही फक्त शेतीमध्येच आतापर्यत बोलली जात होती परंतु यापुढे ती वाहनांमध्ये येणार आहे. इंधन आतापर्यंत कोळशापासून वेगवेगळ्या माध्यमांपासून बनत होते परंतु सोलरला त्यांनी हरित ऊर्जेत घेतलेले आहे. त्या सोबतच हायड्रोजनचे फ्युएलवर बसेस, ट्रक्स धावणार आहेत. बॅटरी ऑपरेटेड कार्स येत आहेत. इंधनाबाबत एक मोठेपाऊल भारताने उचलले आहे. जगाच्या पाठीवर भारत जगाच्या बरोबर सर्व क्षेत्रात येत आहे. त्यासाठी भारताचे शास्त्रज्ञ, इंजिनियर्स, उद्योजक जोमाने कामाला लागलेले आहेत. ह्या वर्षाचे बजेट खूप चांगल्या पद्धतीने सरकारने सादर केलेले आहे. सगळ्यांच्या जीवनात फायदा होणार आहे. सर्व सामान्यांसाठी जे काही टॅक्स बेनिफीट दिलेले आहेत अपेक्षेपेक्षा कमी आहेत परंतु त्यांनी काही तरी देण्याचा प्रयत्न केलेला आहे. अजून जास्त देण्याचा प्रयत्न केला असता तर मध्यमवर्गीय, नोकरदार, सर्वसामान्य वर्ग अजून आनंदी झाला असता.

**– अशोक जैन, अध्यक्ष, जैन इरिगेशन सिस्टीम्स लि., जळगाव**

# लातूरच्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे खासगीकरण थांबवा -खा.सुधाकर शृंगारे

**लातूर/प्रतिनिधी**



सर्वसामान्य जनतेला उत्तम आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी केंद्र सरकारच्या भरीव निधीतून उभारण्यात आलेल्या लातूर शहरातील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे खासगीकरण थांबवावे व हे हॉस्पिटल सरकारने चालवावे अशी मागणी खासदार सुधाकर शृंगारे यांनी केंद्रीय अरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांच्याकडे केली आहे. या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलला माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे नाव देण्यात यावे अशी मागणीही खासदार शृंगारे यांनी केली आहे. नवी दिल्ली येथे झालेल्या भेटी दरम्यान खासदार सुधाकर शृंगारे यांनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल संबंधीच्या मागण्यांचे निवेदन आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांच्याकडे दिले आहे . यावेळी माजी मंत्री आणि आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर हे प्रामुख्याने उपस्थित होते.

नवी दिल्ली येथे राज्यमंत्री डॉ.भारती पवार यांच्या शासकीय निवासस्थानी असलेल्या कार्यालयात खासदार सुधाकर शृंगारे यांनी भेट घेऊन आरोग्य सुविधां विषयक मागणीचे पत्र दिले आहे. या वेळी माजीमंत्री आणि आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांची उपस्थिती होती. खासदार सुधाकर शृंगारे यांनी सदर मागणी पत्रात म्हटले आहे की, केंद्र सरकारच्या सहकार्याने प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजना निधीतुन १५० कोटी रुपयांचे लातूर येथे सुसज्ज असे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल बांधण्यात आले आहे. हे हॉस्पिटल सर्व प्रकारच्या अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांनी सुसज्ज आहे. आयसीयू, डायलिसिस, कॅथलॅब, सुसज्ज ओटीएस, एसएसबी हाय एंड इकोकार्डियोग्राफी सिस्टीम ४डी इको मशीन, एसएसबी होल्टर मशीन, टीएमटी मशीन यासह सर्व प्रकारच्या गंभीर वैद्यकीय सेवा प्रदान करते. केंद्र सरकारने या रुग्णालयाच्या एकूण खर्चापैकी ८०% रक्कम रु.१२० कोटी निधी दिला आहे. हे सुसज्ज रुग्णालय केवळ लातूर जिल्ह्यातील लोकांसाठीच नाही तर महाराष्ट्रातील उस्मानाबाद आणि बीड तसेच कर्नाटकातील बीदर जिल्ह्यातील लोकांना अत्यंत आवश्यक आणि स्वस्त आरोग्य सेवा पुरवणारे ठरणार आहे. कोविड १९ च्या उद्रेकादरम्यान या रुग्णालयात असंख्य रुग्णांवर यशस्वी उपचार करण्यात आलेले आहेत. मागच्या राज्यसरकारने मात्र या रुग्णालयाच्या खासगीकरणा संबंधी कार्यवाही सुरू केली होती. या सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे खासगीकरण झाल्यास सर्वसामान्य जनता, विशेषतः गरीब लोक या सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील महत्त्वाच्या वैद्यकीय सेवांपासून वंचित राहतील. या रुग्णालयाच्या बांधकामासाठी १५० कोटी रुपयांचा निधी केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजना निधीतून देण्यात आलेला आहे. त्यामुळे याचा फायदा गरजू लोकांना व्हावा अशी अपेक्षा आहे. या रुग्णालयाचे खासगीकरण थांबवण्यासाठी त्वरित पावले उचलावीत अशी मागणी खासदार सुधाकर शृंगारे यांनी निवेदना द्वारे केली आहे. तांत्रिक अडचणी बाजूला सारून प्रसंगी हे हॉस्पिटल केंद्र सरकारने विशेष बाब म्हणून चालवावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

# धुळे येथील नाशिक विभागीय तायक्कांडो क्रीडा स्पर्धेत जळगाव जिल्हा तायक्कांडो असोसिएशनच्या खेळाडूंचे वर्चस्व

## १६ सुवर्ण, ४ रौप्य आणि ६ कांस्यपदक

**जळगाव/प्रतिनिधी**

नाशिक विभागीय शालेय तायक्कांडो क्रीडा स्पर्धामध्ये १४,व १७ आणि १९ वर्ष वयोगटातील मुलांमध्ये जळगाव जिल्हा तायक्कांडो असोसिएशनच्या खेळाडूंनी वर्चस्व निर्माण करीत १६ सुवर्ण, ४ रौप्य,६ कांस्यपदकांची लयलूट केली. धुळे येथे सुरू असलेल्या नाशिक विभागीय शालेय तायक्कांडो मुलांच्या काल झालेल्या स्पर्धेत १४ वर्षाखालील १८ ते २१ किलो शिवम् पाटील,( मॉडर्न इंग्लिश स्कूल, रावेर), २१ ते २३ किलो साई शेलार (आचार्य जी आर गरूड माध्य विद्यालय, शेंदुर्णी), २३ ते २५ किलो सिद्धार्थ कुमावत (आचार्य जी आर गरूड माध्य विद्यालय शेंदुर्णी), २७ ते २९ किलो ओम गोंधळी ( आचार्य जी आर गरूड माध्य विद्यालय, शेंदुर्णी) यांनी सुवर्ण पदक पटकावले. तर २९ ते ३२ साई भोई (गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूल, शेंदुर्णी), ३८ ते ४१ किलो साई निळे (सरस्वती विद्या मंदिर, रावेर ) ४१ किलो वरील फरहान पठाण (सावित्रीबाई फुले माध्यमिक, पहूर) यांनी कांस्यपदक पटकावले, १७ वर्ष मुलांमध्ये ३५ ते ३८ किलो भावेश चौधरी (आचार्य जी आर गरूड माध्य विद्यालय,शेंदुर्णी) ३८ ते ४१ किलो दानिश तडवी (मॉडर्न इंग्लिश स्कूल, रावेर) ४१ते ४५ सिद्धांत घेटे (स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, रावेर) ५१ ते ५५ किलो लोकेश महाजन (स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, रावेर), ५९ ते ६३ दिनेश चौधरी (सरदार जी जी हायस्कूल, रावेर), ७८ वरील ऋतिक कोतकर (छत्रपती शिवाजी महाराज, महाविद्यालय, जळगांव) यांनी सुवर्ण पदक पटकावले आहे. तर ५५ ते ५९ किलो प्रविण खरे (शिंदे इंटरनॅशनल स्कूल, पाचोरा), ७३ ते ७८ किलो जयदीप परदेशी (न्यु बु-हानी इंग्लिश स्कूल, पाचोरा) यांनी रौप्य पदक पटकावले तर सतिश क्षिरसागर, अनिरुद्ध महाजन, ललित महाजन यांनी कांस्यपदक पटकावले १९ वर्ष मुलांमध्ये ४५ ते ४८ श्रीकांत महाजन (सरदार जी जी हायस्कूल रावेर), ४८ ते ५१ प्रबुद्ध तायडे (स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, रावेर), ६३ ते ६८ नरेश पाटील (सरदार जी जी हायस्कूल, रावेर), ७८ किलो वरील हेमंत गायकवाड (सरदार जी जी हायस्कूल, रावेर) ५९ ते ६३ अथर्व कुलकर्णी (रावेर) याने रौप्य पदक पटकावले. खेळाडूंना जयेश बाविस्कर, जयेश कासार,जिवन महाजन, श्रीकृष्ण देवतवाल, श्रीकृष्ण चौधरी, सुनील मोरे, हरीभाऊ राऊत यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले आहे सुवर्ण पदक विजेता खेळाडूंची पुढील महिन्यात जळगांव येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय तायक्कांडो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विजेत्यांना संघटनेचे अध्यक्ष अतुल जैन, ललित पाटील, सचिव अजित घारगे, सुरेश खैरनार, रवींद्र धर्माधिकारी, सौरभ चौबे, महेश घारगे, कृष्णकुमार तायडे, अरविंद देशपांडे, यांनी कौतुक करीत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

क्राईम संध्या | सोमवार दि. ०६ फेब्रुवारी २०२३ ते रविवार दि. १२ फेब्रुवारी २०२३ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ५

## मागण्या मान्य झाल्याने थुले यांचे उपोषण मागे



**वाडा/प्रतिनिधी**

आरपीआय प्रणित रिपब्लिकन जनरल कामगार युनियनच्या पुरस्कृत केलेल्या आणि २३ तारखेपासून उपोषणाला बसलेले दिनेश दशरथ थूले यांनी कृष्णा सिलेंडर प्रायव्हेट लिमिटेड महसूल कोंढले तालुका वाडा जिल्हा पालघर या कंपनीचे बांधकाम केले होते त्यांचे (अकरा लाख पन्नास हजार बिल मिळत नव्हते) आणि २५ तारखेला संध्याकाळी ६ वाजता तहसीलदार वाडा यांच्या कार्यालयामध्ये बैठक झाली त्यामध्ये पोलीस निरीक्षक वाडा तालुका दशरथ पाटील यांच्यासमक्ष अध्यक्ष रमेश भोईर, कोंडले पोलीस पाटील ज्योती थूले आणि कंपनीचे मालक जय शहा संघकारा उर्फ गोपाल शेठ हे सर्व उपस्थित होते त्यामध्ये त्यांनी पन्नास हजाराचा चेक आणि बाकी असलेली रक्कम एक लाख ६३ हजार हे जयेंद्र दिनकर देतील. कंपनी मालक अजून एक लाखाचा चेक देणार आहेत आणि त्याचबरोबर सात लाखाचं लिहून त्यांनी दिलेला आहे. हे सर्व २५ एक २०२३ रोजी रात्री साडेनऊ वाजता उपोषण करत असलेल्या ठिकाणी जाऊन कंपनी मालक जय शहा संघकारा, रमेश भोईर पोलीस पाटील कोंडले ज्योती थूले कुडूस आऊट पोस्ट चे हेडकॉन्स्टेबल अविनाश सोनवणे त्यांचे सहकारी आणि सतीश भोईर, राजेन्द्र जाधव नामदेव थूले उपस्थित सर्व मान्यवर यांच्या उपस्थितीमध्ये त्यांना नारळ पाणी देऊन उपोषण समाप्त करण्यात आले.

# विद्यार्थ्यांनो! आई-वडिलांच्या कष्टाचे स्मरण करा-ज्येष्ठ कवी योगीराज माने

**लातूर/प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनो! तुमच्या सर्वांगीण विकासासाठी तुमचे आई-वडील सातत्याने कष्ट करतात आणि आपल्याला सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देतात त्यामुळे आपण सर्वांनी आपल्या आई-वडिलांच्या कष्टाचे स्मरण करून आपली शैक्षणिक प्रगती साधली पाहिजे असे प्रतिपादन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी योगीराज माने यांनी बोलताना व्यक्त केले. महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, लातूर द्वारा वार्षिक स्नेहसंमेलन २०२३ महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आले होते यावेळी ते उद्घाटक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव मन्मथप्पा लोखंडे हे होते तर विचार मंचावर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ संचालक ॲड.श्रीकांतप्पा उटगे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.दिनेश मौने, उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा.संजय पवार, उपप्राचार्य प्रा.बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा.शिवशरण हावळे, संयोजन समिती सदस्य डॉ.श्रद्धा मिसर (अवस्थी), प्रा.वनिता पाटील, प्रा.रवींद्र सुरवसे आणि प्रा.उदय धनुरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्व मान्यवरांनी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले आणि दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली त्यानंतर संगीत विभागातील प्रा.विजयकुमार धायगुडे, प्रा.विश्वनाथ स्वामी, प्रा.गोविंद पवार आणि विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले. पुढे बोलतांना कवी योगीराज माने म्हणाले की, आपल्याला जीवनात यश संपादन करायचे असेल तर आपण नियमितपणे अभ्यास केला पाहिजे. आपल्या जीवनाला आपल्या आई-वडिलांना समवेत आपले शिक्षक आकार देतात. आज वृद्धाश्रमाचे लोन हे पसरू लागले आहे मात्र आपण त्यांनी केलेल्या कष्टाची जाणीव ठेवून त्यांना वृद्धाश्रमाचा मार्ग दाखवू नये. यावेळी जिजाऊच्या पोटी शिवाजी जन्म घ्यावा, गावाची कविता, बुढापा महान होता है!, मला अजून आठवतंय माझं खेड्यातलं घर, बाप माझा, लव स्टोरी लव स्टोरी असते थोडसं प्रॅक्टिकल आणि थोडंस थिअरी असते, वावरात राबणारी माझी माय साधी भोळी, चिमणी आणि कावळा संवाद, चला सीमेवर जाऊ... अशा विविध समाज प्रबोधनपर कवितांनी महाविद्यालयातील प्रमुख अतिथी, शिक्षक आणि विद्यार्थ्यांची त्यांनी मने जिंकली. विविध कविता सादर करून त्यांना त्यांनी विद्यार्थ्यांना सुद्धा त्यामध्ये सहभागी करून घेतले. आजचा कार्यक्रमाच्या माध्यमातून कुणी ना.धो.महानोर तर कुणी बहिणाबाई बनेल असा आशावादही त्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी मनोगतपर मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिनेश मौने म्हणाले की, महाविद्यालयांमध्ये बौद्धिक गुणी विद्यार्थ्यांसोबत सांस्कृतिक व कला क्षेत्रात गुणी असणारे विद्यार्थी असतात. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा असा सातत्याने प्रयत्न केला जातो. विद्यार्थ्यांना परीक्षा व विविध शैक्षणिक कार्यातून थोडा विरंगुळा मिळावा आणि जीवनामध्ये आनंद निर्माण व्हावा यासाठी वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित केले आहे याला आपण सर्वांनी सहकार्य करावे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे सचिव मन्मथप्पा लोखंडे म्हणाले की, कविता ही आपले जीवन घडविते. आपण आपले आई-वडील आणि नातेवाईक यांचे स्मरण केले पाहिजे. प्रत्येकाच्या मनामध्ये प्रेमाचा ओलावा असला पाहिजे. कवी योगीराज माने यांना आपण पण चांगली सकारात्मक साथ दिली त्याबद्दल त्यांनी सर्वांचे कौतुक केले. यावेळी शुभेच्छ्यापर मनोगत ज्येष्ठ संचालक ॲड.श्रीकांतप्पा उटगे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.कल्पना गिराम, डॉ.टि.घन:श्याम यांच्यासह सोमवसे पूजा, विजय चक्रे, योगेश नागरगोजे, निकिता मोरे आणि चोथवे दिपाली यांनी केले तर आभार प्रा.वनिता पाटील यांनी मानले. या कार्यक्रमाला वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सूत्रसंचालन समिती, आनंद नगरी समिती, परीक्षक समिती, पुष्पहार समिती, स्टेज डेकोरेशन समिती, विविध गुणदर्शन समिती, शेलापागोटे समिती, प्रवेशद्वार शिस्तपालन समिती, बैठक व्यवस्था समिती, प्रसिद्धी समिती, भोजन व्यवस्था समिती, भोजन वाटप समितीतील सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.



## वडमुरंबी येथील जीवन शिक्षण विद्यालयात निरोप समारंभ!



**देवणी/प्रतिनिधी**

तालुक्यातील वडमुरंबी येथील जीवन शिक्षण माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाच्या अकरावीच्या विद्यार्थ्यांकडून बारावीच्या विद्यार्थ्यांना गुरुवारी (दि.२) निरोप समारंभ देण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य निळकंठ बोडके, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव ज्ञानोबा कलमे प्रा. प्रमोद लासोणकर, प्रा.नरसिंग मोटे, प्रा. हनुमंत आवाळे, प्रा.दत्तात्रय भंडे, प्रा.श्रीकांत स्वामी, सुरेश मुळजे, सौ शारदा नागणगिरे, श्रीमती संध्या जाधव आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सावित्रीदेवी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आले अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या सत्कारानंतर मान्यवरांचे, शिक्षक व विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

हे कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता श्रद्धा मोरे, वैष्णवी पवार, अभिषेक लोंढे, वीरेश बिरादार, भाग्यश्री मस्के, ज्योती बिरादार, शितल बिरादार, प्रतिक्षा सूर्यवंशी, शिवानंद स्वामी, राजेंद्र सूर्यवंशी आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास प्रा लक्ष्मण शेळके, प्रा.रेवण मळभगे, महेश बिरादार, बब्रुवान मोरे, सुधाकर मामडे, गणेश बिराजदार आदींसह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रणिता आंबेगावे यांनी तर सूत्रसंचालन मयूरी मोरे यांनी केले तर आभार योगेश आवाळे यांनी मानले.

## जिल्हा परिषद शाळा शिलटे येथील अशोक किणी गुरूजी यांचा सेवापूर्ती सत्कार समारंभ संपन्न

**सफाळा/एच.लोखंडे**



पालघर तालुक्यातील सफाळे पश्चिमेला असलेल्या जि.प. शाळा शिलटे येथील कार्य कुशल प्रमुख शिक्षक अशोक किणी गुरूजी यांचा दिनांक ३१ जानेवारी रोजी सेवापूर्ती सत्कार समारंभ संपन्न झाला. त्या प्रसंगी प्रमुख पाहुणे विश्वनाथ म्हात्रे-माजी गटशिक्षणाधिकारी पालघर यांनी सांगितले अशोक किणी गुरुजींच्या कार्याची हि पावती असून, लहान बालकापासून ते गावातील ज्येष्ठ मंडळीं यांनी गुरुजींच्या यांच्या सेवा निवृत्ती कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थी आणि ग्रामस्थांनी अश्रू सुमनांनी दिलेला निरोप हाच त्यांचा सर्वोच्च पुरस्कार आहे. अलका भोईर-सरपंच शिल्टे ग्रामपंचायत कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विराजमान होत्या. तर गंगाधर म्हात्रे-आदिवासी समाज सेवक पुरस्कार प्राप्त - महाराष्ट्र शासन तथा जेष्ठ पत्रकार, लेखक. महेंद्र पाटील सर-सरपंच ग्राम पंचायत मांडे, आदि व्यासपीठावर विराजमान होते. या प्रसंगी सत्कार मूर्तीचे कुटुंबीय, आप्तेष्ट, मित्रवर्य, शिक्षक, माजी विद्यार्थी व ग्रामस्थांनी आप आपले मनोगत व्यक्त केले. शाळेतील बालकांनी सुमधुर स्वरात शुभेच्छा गीतांनी व नृत्याविष्काराद्वारे मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेंद्र लहांगे यांनी केले. सौ.नलिनी गिराणे, उपसरपंच, सौ. पुनम वर्गणे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा शिल्टे पाडा, सुभाष हेमाडे -माजी पंचायत समिती सदस्य, शिवाजी धनासुरे-ग्रामसेवक ग्रामपंचायत शिल्टे ता.जी. पालघर, सर्व ग्रा.पं. आजी माजी सदस्य, अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रम समाप्तीनंतर गावातील तरुण, महिला भगिनी व ग्रामस्थांनी संपूर्ण शिलटे गावातून सत्कारमूर्तीची मिरवणूक काढून, सरांना साश्रू नयनांनी निरोप दिला. दिनांक ३० जानेवारी २०२३ रोजी जिल्हा परिषद शाळा माकणे केंद्र प्रमुख व जिल्हा परिषद शाळा टेंभिखोडावे केंद्र प्रमुख व सर्व शिक्षकांनी अशोक किणी गुरूजी यांचा यथोचित सेवापूर्ती सत्कार समारंभ आयोजित केला होता. या वेळी माकणे व टेंभिखोडावे केंद्राच्या केंद्रप्रमुख श्रीम. दीपिका नाईक यांनी किणी सरांनी प्रामाणिकपणे,निस्वार्थपणे केलेल्या उत्कृष्ट सेवाभावी कार्याचे कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या. केंद्रातील शिक्षकांनाही किणी सरांविषयीमम बोलतांना कंठ दाटून आलेला. विद्यार्थी प्रेमी गुरूजीना पुढच्या वाटचालीसाठी हार्दिक शुभेछा.

## उल्हासनगरात मनविसेनेच्या जिल्हासंघटक मनोज शेलार यांना जीवे मारण्याची धमकी



**उल्हासनगर/किरण तेलगोटे**

उल्हासनगर महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे कल्याण संघटक मनोज शेलार यांना फेसबुक वरून जीवे मारण्याची धमकी देण्यात आलेली आहे. धमकी देणाऱ्या अज्ञात व्यक्ति विरोधामध्ये ही लाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाये. उल्हासनगर मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे कल्याण जिल्हा संघटक मनोज शेलार यांना फेसबुक वरून जीवी मारण्याची धमकी देण्यात आलीये.यामुळे शहरात एकच खळबळ उडाली. मनोज शेलार यांच्यावर यापूर्वी जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. शैक्षणिक क्षेत्रात काम करत असल्याने काही भूमाफिया आपल्याला जाणून-बुजून टारगेट करत असल्याचा आरोप मनोज शेलार यांनी केलाये. तेव्हा उल्हासनगरच्या हिल्लाईन पोलीस ठाण्यामध्ये कार्यकर्त्यांसह वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना भेटून निवेदन दिले. पोलिसांनी या निवेदनावरून अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल केलाये.

साप्ताहिक क्राईम संध्या ऑनलाईनही वाचता येईल....
www.crimesandhya.com
9 8 9 0 7 1 8 8 7 3

## कॉम्पुटरच्या दुकानाला भीषण आग; इलेट्रॉनिक माल जळून खाक!



**उल्हासनगर/किरण तेलगोटे**

उल्हासनगरमध्ये एका कम्प्युटरच्या दुकानाला भीषण आग लागली असून या आगीमध्ये लाखोंच्या कम्प्युटरचं नुकसान झाले. शॉर्टसर्किट मुळे ही आग लागली असं बोललं जातंय. अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेऊन आगीवर नियंत्रण मिळवलं. कॅम्प-४ मधील मधील भाटिया परिसरात शॉटसर्किट मुळे एका दुकानाला भीषण आग लागली.या आगीत कॉम्पुटरचं लाखोंचं नुकसान झालंय.आय टी वर्ल्ड असं दुकानाचं नाव आहे.घटनेची माहिती मिळताचं अग्निशमन दलाच्या जवानानी घटनास्थळी धाव घेऊन आगीवर नियंत्रण मिळवलं.या आगीत कुठली जीवितहानी झाली नाही.ही आग एका वर्दळीच्या रस्त्यावर लागली होती. यामुळे मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

### वसई-विरार शहर महानगरपालिका
**प्रभाग समिती 'अे', बोळींज**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय बोळींज येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत हितसंबंधच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय बोळींज येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र | दिनांक | वॉर्ड क्रमांक/ मालमत्ता क्रमांक | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्याचे नाव किंवा अभिहस्तांकन कर्त्यांचे नाव | खरिदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | मालमत्तेचे स्वरूप | पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ५/१/२०२३ | BL02/176/63 | जगन्नाथ भवरकर | आशुतोष प्रताप चव्हाण व निकिता आशुतोष चव्हाण | निवासी | ए/४०४, कृष्ण रायलीला बोळींज सोपारा रोड |
| २. | ५/१/२०२३ | BL07/300/31 | गोपीनाथ कोन्गार पुथूस्सेरि | मनोज छगन कोल्हे व सिमा मनोज कोल्हे | निवासी | वाय.के.नगर एनक्स न्यू १०० फुट रोड यशवंत सार्थक टॉवर |
| ३. | ५/१/२०२३ | BL07/113/45 | गणेश दिगंबर मयेकर | आशिष अनंत चव्हाण व दर्शना आशिष चव्हाण | निवासी | वासु कमल रूम नं. सी/३०८, तिरुपती नगर रोड राधा कुंजच्या बाजूला |
| ४. | ५/१/२०२३ | BL06/121/84 | विवेक मलिखान चौधरी | अपर्णा गोविंद दांडेकर | निवासी | वैभव कुटीर रूम नं. ई/२०४ गोकुळ टाऊनशीप रोड |
| ५. | ५/१/२०२३ | BL07/42/7 | जयंतीबाई जैन व सुरेश जैन | क्षितीष राजेश आनंद व यशस्वी राजेश आनंद/आरती राजेश आनंद | निवासी | विरार |
| ६. | ५/१/२०२३ | BL07/229/98 | दिनेश रमाकांत शुक्ला/ सिमा दिनेश शुक्ला | सीमा दिनेश शुक्ला | निवासी | अंबो विहार इ.नं.८ रूम नं. सी/७०१ तिरूपती नगर |
| ७. | ५/१/२०२३ | BL04/118/2 | समिधा हरिश राऊत | सुनिल कुमार भवरलाल जैन व आशा सुनिल जैन | निवासी | पारितोष रूम नं. ए/१०२, विरार रोड |
| ८. | ५/१/२०२३ | BL07/13/26 | गोगन घेला कडछा व सुंदर गोगन कडछा | देवीबेन मेरूभाई भोगेसरा व मेरूभाई भोगेसरा | निवासी | मिथिला अपार्टमेंट ३ रूम नं. ई/०२ राम मंदिराच्या बाजूला |
| ९. | ५/१/२०२३ | BL03/202/24 | आदिनाथ डेव्हलपर्स | कोसु लोबो | निवासी | आदिनाथ डेव्ह. पद्मावती नगर से.क्र.२ इ क्र. २ ए/४०४ |
| १०. | ५/१/२०२३ | BL07/99/21 | सुशिल चंद्रकांत जयकर | राहुल सुदेश तावडे व लीना राहुल तावडे | निवासी | सिंधु गार्डन टाईप रूम नं. बी/०४ बोळींज |
| ११. | ५/१/२०२३ | BL07/189/27 | जागृती संजय राणा व निलेश बसतीमल जैन | भावीनी जयेश छेडा व जयेश नानजी छेडा | निवासी | नैरूत समोर वाय.के नगर धुमी रूम नं. बी/२०३ बोळींज |
| १२. | ५/१/२०२३ | BL07/286/170 | प्रविण गौतम राणे व सपना प्रविण राणे | अक्षय दत्तात्रय म्हात्रे व पुजा अक्षय म्हात्रे | निवासी | अग्रवाल हाईट्स रूम नं. एफ/६०९ बोळींज |
| १३. | ५/१/२०२३ | BL02/183/17 | सुर्यप्रकाश पी. उपाध्याय | रमेश नरसु गावडे व मंगल नरसु गावडे | निवासी | क्रिष्णा यशोधन रूम नं. ए/४०१, बोळींज |
| १४. | ५/१/२०२३ | BL03/333/41 | सावित्री बी. नारेकर | महेश नेतानी सैदाणे व मिनाक्षी महेश सैदाणे | निवासी | सिल्वर ओक सी/१०३, पद्मावती नगर रोड |
| १५. | ५/१/२०२३ | BL02/220/19 | अब्रॉल सिंडीकेट | सिसिलिया विल्सन रॉड्रीग्ज/बारीय विल्सन रॉड्रीग्ज/ ब्रायन विल्सन रॉड्रीग्ज | निवासी | ॲब्राल इन्वलेव्ह सी.एफ.सी. हॉल नं. ५ |
| १६. | ५/१/२०२३ | BL04/303/194 | मिलिंद आत्माराम तेंडुलकर | जिनल हिरेन सांगणी | निवासी | व्हॉयलेट बि नं. १६ रूम नं.. डी/४०३ यशवंत नगर |
| १७. | ५/१/२०२३ | BL07/259/82 | उमेश विष्णू शिंदे | रंजत संतोष संखे व स्वप्निल संतोष संखे | निवासी | नवीन विवा कॉलेज वाय के एनक्स सी/४०५ पॅराडाईन पार्क |
| १८. | ५/१/२०२३ | BL06/156/30 | मितेश रंजनीकांत मेहता व प्रेमजी मेघाजी टॉक | प्रमोद रत्नाकर तोडलेकर | निवासी | बी/३०२ गोकुळ एम्पायर को.हौ.सो. अग्रवाल गार्डन |
| १९. | ५/१/२०२३ | BL06/167/11 | गणेश विचारे व रूपाली विचारे | मितेश सुवालाल पाटील व साधना सुवालाल पाटील | निवासी | ए/२०३, गोकुळ सत्संग गोकुळ टाऊनशीप बोळींज |
| २०. | ५/१/२०२३ | BL03/335/16 | चावरे असोसिएट्स | शिरीष डी. चौरसिया | निवासी | रूम नं. ३०४, उज्वल चावरे संकुल बोळींज |

जा.क्र. : वविशम/बो-कर २३९९/२०२३
दिनांक : ३०/०१/२०२३

**सही/-**
**प्र. सहा.आयुक्त**
**प्रभाग समिती 'अे', बोळींज**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

06 TO 12 FEBRUARY 2023 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 2/4/2023 9:58 PM Page 1





**उप कोषागार कार्यालय, डहाणूच्या वतीने १ फेब्रुवारी २०२३ रोजी लेखा व कोषागारे दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रसाद मोर्वेकर अप्पर कोषागार अधिकारी, तुकाराम प. मुंढे उपलेखापाल, सुरेश व. जाधव उपस्थित होते.**

# जप्त केलेल्या २३ वाहनांचा १५ फेब्रुवारीला ई- लिलाव

**सोलापूर/प्रतिनिधी**

मोटार वाहन कर न भरलेल्या व मोटार वाहन कायद्यातील विविध गुन्हयांतर्गत जप्त केलेल्या २३ वाहनांचा जाहिर ई-लिलाव उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर येथे दिनांक १५ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी ११ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत होणार असल्याचे कराधान प्राधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांनी कळविले आहे. सदर वाहने उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर येथील आवारात दिनांक ३ ते १३ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत कार्यालयीन वेळेत पाहणी करण्यासाठी उपलब्ध आहेत. जाहिर ई-लिलावात एकूण २३ वाहने उपलब्ध असून, यामध्ये बस, ट्रक, डी व्हॅन, पिकअप व्हॅन, टुरिस्ट टॅक्सी, जेसीबी या वाहनांचा समावेश आहे. ई-लिलावाच्या तारखेपर्यंत वाहन कर भरण्याची संधी राहील याची वाहन मालकांनी नोंद घ्यावी. ई-लिलाव होणाऱ्या वाहनांची यादी जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांचे सूचना फलकांवर नागरिकांच्या माहितीसाठी लावण्यात आली आहे.

इच्छुक व्यक्तींनी वर नमूद केलेल्या स्थळी वाहनांची प्रत्यक्ष पाहणी करता येईल. जाहिर ई-लिलावात सहभागी होण्यासाठी दिनांक ३ ते १३ फेब्रुवारी २०२३ या कालावधीमध्ये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर येथे खटला विभागात सकाळी ११ ते संध्याकाळी ५ यावेळेत प्रत्येक वाहनांसाठी DY RTO SOLPUR या नावे ५० हजार रुपये अनामत रकमेचा डीमांड ड्राफटसह ऑनलाईन सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती, नाव नोंदणी करणे व कागदपत्रे पडताळणी सादर करणे गरजेचे आहे. लिलावाचे अटी व नियम बुधवार, दिनांक ३ फेब्रुवारी २०२३ पासून कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर येथील नोटीस बोर्डावर सकाळी ११ ते दुपारी ५ या वेळेत उपलब्ध राहील. तसेच सदर वाहने जशी आहेत तशी या तत्त्वावर जाहिर ई-लिलावाद्वारे विकली जातील. कोणतेही कारण न देता सदर जाहिर लिलाव रद्द करण्याचे अथवा तहकूब ठेवण्याचे अधिकारी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी तथा कराधान प्राधिकारी, सोलापूर यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.



**अंधेरी पूर्व येथील तेजस्वी महिला मंडळाच्या अध्यक्षा आणि सामाजिक कार्यकर्त्या कल्पणाताई इंगळे यांनी आपल्या २०० पुरुष आणि महिला कार्यकर्त्यासह त्र्यंबकेश्वर, शिर्डी, शनी शंगणापुर, पंचवटी व तंबेश्वर या धार्मिक स्थळी सहल आयोजित केली होती त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**

पान १ वरून...

## तिला झाल्या दोन्ही मुली...

कालांतराने पुन्हा अश्विनीला दिवस गेले. एकनाथला आता आपल्याला मुलगा होईल अशी अपेक्षा होती. एक मुलगा आणि आणि एक मुलगी आणि आम्ही दोघे असे सुखी संसाराचे स्वप्न त्यांनी रंगविले होते. पण यावेळी ही त्यांना पुन्हा मुलगीच झाली. दुसऱ्या मुलीच्या जन्माने एकनाथ काहीसा नाराज झाला होता. पण तरी ही त्याने नाराजी न दाखविता दुसऱ्या मुलीच्या जन्माचे स्वागत केले. त्यांनी तिचे नाव मोठया लाडाने स्वरा असे ठेवले. समृध्दी ही आता ११ वर्षाची झाली तर स्वरा ही ७ वर्षाची झाली होती.हसता खेळता परिवार होता. पण एकनाथच्या मनात आपल्याला एक मुलगाच पाहिजे असा विचार येत होता. दोन्ही मुली झाल्या तरी काही हरकत नाही पण आता तिसरा चान्स घेताना मुलगाच पाहिजे असे त्याने ठरविले होते. तसे त्याने पत्नी अश्विनीला बोलून ही दाखविले.तिने ही त्याला धीर देत तिसऱ्यादा का होईना आपल्याला मुलगाच होईल असे ठाम विश्वास दिला. अलकिडे तिला तिसऱ्यादा दिवस गेलेत असे त्याला व त्याच्या कुंटुंबियातील सर्वाना माहित होते. अश्विनीला तिसरा मुलगाच झाला पाहिजे असा अट्टाहास एकनाथच्या आईने आणि बहिणीने धरला होता. तिला दिवस गेलेत असे एकनाथला समजल्यावर त्याने तिला कोल्हापूरातील एका चांगल्या दवाखान्यात नेऊन तिची सोनोग्राफी केली. त्या सोनाग्राफीमध्ये मुलगी असल्याचे निष्पन्न झाल्यावर त्यांनी तिचा गर्भपात केला.आणि येथूनच नवरा बायकोच्या भांडणाला सुरूवात झाली. मुलगी जन्माला घालते असे म्हणत त्यांनी अश्विनीचा मानसिक आणि शारिरीक छळ सुरू केला. अलिकडे एकनाथ हा घराकडे येताना दारू पिऊनच येत होता.घरात आले की तो आश्विनी बरोबर भांडण करून तिला मारहाण करीत होता. त्याच्या या त्रासाला ती कंटाळली होती. दोन्ही मुलीच झाल्याने तिलाच दोष देण्यात येत होता. घरातील सासू नवरा आणि अन्य येणारे पाहुणे तिला टोचून बोलत होते. नवऱ्या बरोबरच्या सततच्या भांडणाला कंटाळून आपल्या दोन्ही मुलीना घेऊन तिने आपले माहेर केर्ले गाठले. ती आपल्या दोन्ही मुलीना घेऊन माहेरी गेली असल्याने एकनाथ हा तिच्यावर जास्तच चिडला होता. याला कारण ही तसेच होते. अश्विनीने ही आपल्या पै-पाहुण्यात नवरा आणि सासु मुली झाल्याने आपला जाच करताहेत असे सांगितले होते. त्यामुळे एकनाथची अब्रु जात होती. घरची भांडणे चव्हाट्यावर आली होती. त्यातच अश्विनीच्या आई वडिलांनी येवून आपल्या मुलीला का त्रास देतो आहेस? याचा जाब त्याला विचारला होता. त्यामुळे तो आणखीन जास्तच तिच्यावर चिडला होता. ती परत परत भांडण करून आपल्या माहेरी जात असल्याने त्याने ही त्यावेळी आपल्या सासु सासऱ्याच्याबरोबर भांडण करून तुमच्या मुलीला तुमच्याकडेच ठेवून घ्या.ती फक्त मुली जन्माला घालण्याचे मशिन आहे बाकी तिचा काही उपयोग नाही असे बजावले होते. त्यामुळे त्याचे सासु सासरे हे नरमाईने घेत होते.आपल्या मुलीचा काही दोष नाही तरी ही ते मुलीची बाजू आहे म्हणून गप्प राहत होते. त्याचा एकनाथ हा फायदा घेत होता.माहेरी गेलेली अश्विनी परत आली त्याचे पुढे पुन्हा मागचे तसे पुढे होत होते. कोल्हापूरहून रात्री दुकान बंद करून परत येत असताना तो दारू पिऊन घरी येवू लागला. घरात येवून मला मुलगा पाहिजे बघ तु फक्त मुलीच जन्माला घालतेस म्हणून तिच्याबरोबर भांडण उकरून तिला मारहाण करीत होता. दररोज नवरा बायकोची या कारणातून भांडणे ही ठरलेलीच होती. त्या भांडणाला एकनाथची आई ही खतपाणी घालत होती. त्यामुळे ती भांडणे मिटण्याऐवजी वाढतच होती. यातून मार्ग काही निघत नव्हता.

याबाबत अश्विनीच्या आई वडिलांनी एकनाथची आणि त्याच्या आई वडिलांची किती किती तरी वेळा समजूत काढली होती. पण त्याचेवर त्याचा काहीच परिणाम झाला नव्हता.ते परत परत अश्विनीला या कारणातून त्रास देत होते. तिचा ते शारीरिक व मानसिक छळ करीत होते. यातच दोन्ही मुलीच झाल्याने एकनाथ ही चिडचड होत होती.त्याला तो तरी काय करणार होता. शुक्रवार दि.२७ जानेवारी रोजी तो दुकान बंद करून येताना फुल्ल दारू पिऊनच आला होता. रात्री त्याचे पत्नी अश्विनी बरोबर परत याच कारणातून भांडण सुरू झाले होते. दोन्ही मुली आणि आई वडिल दुसऱ्या खोलीत झोपले होते. तो तिला मारहाण करीत शिव्या देत दात ओठ खात होता. ती ही त्याला प्रतिउत्तर देत मुली जन्माला मला कशाला दोष देताय. याला तुम्हीच जबाबदार आहे. असे म्हणत खिजवले होते. त्यामुळे त्याने त्या भांडणात तिच्या स्कार्पने तिचा जोरात गळा आवळून धरला. ती त्याचे तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत होती. पण त्याने पुर्ण ताकदीने तिचा गळा आवळून धरल्याने तिला काहीच हालचाल करता येत नव्हती. काही क्षणातच तिची हालचाल मंदावली. ती निपचिप पडली.तिचा श्वास कोंडला गेल्याने जागीच तिचा मृत्यू झाला.आता काय करावे म्हणून त्याने तिच्या मृत्यूचा बनाव निर्माण करण्यासाठी त्याच स्कार्पने तिचा मृतदेह घरातील पंख्याला लटकविला. तो पर्यत पहाट होत आली होती. या दरम्यान त्याने अश्विनीला खाली उतरवून कोल्हापूरच्या सीपीआर रुग्णालयात नेले. तेथील डॉक्टरांनी तिची तपासणी करून तिचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगितले. पहाटेच्या दरम्यान त्याने अश्विनीच्या माहेरच्या लोकांना फोन करून सांगितले की अश्विनीला विजेचा धक्का बसला असून तिला कोल्हापूरच्या सीपीआर दवाखान्यात नेले आहे. सकाळी सकाळीच केर्लेहून अश्विनीच्या माहेरकडचे लोक सीपीआरमध्ये दाखल झाले. मुलीचा मृतदेह बघून तिच्या अशई वडिलांना वेगळीच शंका आली. तिच्या गळ्यावर कशाचे तरी व्रण दिसत होते.त्यांना अगोदरच एकनाथ आणि त्याचे आई वडिल मयत अश्विनीचा मानसिक शारीरिक छळ करीत असल्याचे माहित होते. गळ्यावरील ओरखडल्याच्या खुणा बघून अश्विनीच्या माहेरकडचे लोक चिडले. त्यांनी एकनाथला गाठून याबाबतचा जाब विचारला असता तो काही त्यांना तिचा विजेचा धक्का लागून तिचा मृत्यूं झाल्याचे सांगत होता. पण त्याचा त्याचेवर विश्वास नसल्याने त्यांनी रागाच्या भरात त्याला मारहाण केली.जबर मारहाणीनंतर त्याला त्यांनी तेथील पोलीसात दाखल केले. आणि आपली शंका व्यक्त केली. तो पर्यत अश्विनीचा मृतदेहाचे शवच्छिेदन करण्यात आले होते.त्यामध्ये तिचा गळा आवळ्याचे नमुद करून श्वास कोठून मृत्यू असा उल्लेख केला होता. या घटनेची नोंद अश्निीच्या वडिलांनी करवीर पोलीस ठाण्यात करून जावाई एकनाथ पाटील याच्या विरोधात तक्रार दाखल केली. त्याचे तक्रीवरून पोलीसांनी एकनाथ कृष्णांत पाटील याला ताब्यात घेऊन त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता बऱ्याच वेळाने त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का?आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. अश्विनीचे वडिल बाबसाहेब माने (वय ६०) रा.केर्ले याच्या तक्रारीवरून करवीर पोलीसांनी अश्विनी एकनाथ पाटील (वय २८) हिचा गळा आवळून खूनकरून आत्महत्येचा बनाव केल्याप्रकरणी एकनाथ कृष्णा पाटील (वय ३५). रा.दोनवडे ता.करवीर याच्या विरोधात करवीर पोलीस ठाण्यात भा.दं.वी. कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला अश्विनीचा स्कार्प जप्त केला.या घटनेचा पुढील तपास करवीर पोलीस ठाण्याचे पो.उप.निरी.निवास पवार हे करीत आहेत. मुलगा किंवा मुलगी जन्माला घालणे हे सर्वस्वी पुरूषाच्या हातात असते यात स्त्रीचा काहीच दोष नसतो हे माहित असून देखील काही जण आज ही यासाठी स्त्रीलाच दोषी ठरवित असतात. खरे तर हे पुरूष कोत्या विचारांचीच असली पाहिजेत नाही तर त्यांनी मुलगा किंवा मुलीत भेद केलाच नसता.मुलाच्या हट्टापायी कोण कोणत्या थराला जातो.हेच या घटनेवरून दिसून येते.

## तिसरे लग्न केले पण तेही नाही...

वावरु लागली. सिल्लोड तहसील कार्यालयात कोतवाल पदावर कविता तर गजानन आढाव हा औरंगाबाद येथील वीज वितरण कंपनीत लिपीक म्हणून नोकरीला आहे. दोघेही सुशिक्षीत नोकरदार असल्यामुळे कविताचा हा संसार टिकेल अशी आशा तिच्या आई-वडीलांसह भावालाही होती. पण काही दिवसांतच त्यांची ही आशा मावळली. लग्नानंतर काही दिवसांतच कविताला गजानन आणि त्याच्या घरच्या लोकांचे खरे रुप समजले. गजानन याने यापुर्वी दोन लग्न केली असल्याचे कविताला समजल्यानंतर तिला मानसिक धक्का बसला. लग्नानंतर काही दिवसांतच गजाननची आई आणि बहीणी या कविताचा शारिरीक आणि मानसिक छळ करू लागल्या. त्या तिच्याकडे पाच लाख रूपयांची मागणी करत होत्या. औरंगाबाद येथे घर घेण्यासाठी हे पैसे त्यांना हवे होते आणि ते पैसे कविताने द्यावेत अशी त्यांची अपेक्षा होती, यासाठी ते नुसता तगादाच लावत नव्हते, तर शारिरीक आणि मानसिक छळही करत होते. गजाननही त्यांना साथ देत होता. आपल्याला सासरी त्रास होत असल्याबाबत कविताने आपला भाऊ सुनिल यास सांगितलेही होते. लग्नाला वर्षही झाले नव्हते, पण कविताचा त्रास दिवसेंदिवस वाढत चालला होता. यामध्ये गजानन तिला मारहाण करत असल्याने काही दिवसांपूर्वीच कविताने हर्सुल पोलीस ठाणे गाठले आणि नवऱ्याविषयी तकार दाखल केली. कविता पोलीस ठाण्याची पायरी चढल्यामुळे सासरच्या लोकांनी नमते घेतले. त्यांनी समजुतीची भूमिका घेत कविताला घरी येण्यास सांगितले. सासरच्या लोकांनी नमते घेतल्यामुळे निदान आता तरी आपल्या बहीणीचा त्रास कमी होईल अशी अपेक्षा कविताच्या भावाला वाटत होती, पण थोड्याच दिवसांत त्याची ही अपेक्षा फोल ठरली. शनिवार दि. ३१ डिसेंबर २०२२ रोजीची रात्र. सारे जग नव्या वर्षाच्या स्वागताची तयारी करत असतांना साधारण साडेआठ ते नऊच्या दरम्यान कविताचा भाऊ सुनिल साखळे याला फोन आला की तुमच्या बहीणीचा आणि भाऊजींचा अपघात झाला आहे. तुम्ही ताबडतोब अमूक ठिकाणी या. हा निरोप ऐकून सुनिल साखळे हे घाईघाईने घटनास्थळी गेले. ज्याठिकाणी अपघात झाला होता त्याठिकाणी कोणीच दिसत नव्हते, पण एका ट्रॅक्टरखाली कविता निपचित पडलेली दिसली. हे दृष्य पाहून यांना शंका आली. दोघांचा अपघात झाला तर याठिकाणी कविताच एकटी कशी दिसते आणि ती ज्या अवस्थेत त्याठिकाणी पडलेली होती ते पाहून त्यांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. दोन चाकांच्या मधोमध कविता पडली होती. कोणी तिला याठिकाणी उचलून ठेवले आहे अशा स्थितीत ती पडली होती. सुनिल यांनी जवळ जावून पाहिले, तेंव्हा कविताचा श्वास बंद झाला होता. याचा अर्थ ती मरण पावली होती. सुनिलबरोबर आणखी लोक होते, त्यांनी सुनिलची अवस्था पाहून त्याला धीर दिला आणि हे नक्कीच काहीतरी गौडबंगाल आहे. पोलीस ठाण्यात याची माहिती द्यायला हवी असे सुचवले. त्याप्रमाणे सुनिल साखळे यांनी भोकरदन पोलीस ठाणे गाठले आणि घटनेची माहिती दिली. भोकरदन पोलीस ताबडतोब घटनास्थळी हजर झाले. त्यांनी घटनास्थळ आणि मृतदेहाची पहाणी केली. पंचनाम्याचे सोपस्कार करून मृतदेह भोकरदन ग्रामीण रुग्णालयात पोस्टमार्टमसाठी आणला. सुरुवातीला भोकरदन पोलिसांनी या प्रकरणात आकस्मिक मृत्यूची नोंद केली होती. पोलिसांनाही हे प्रकरण संशयास्पद वाटत होते. हा अपघात नसून घातपातच आहे याची त्यांना खात्री होती, म्हणून पोलिसांनी कविताची पार्श्वभूमी समजावून घेतली. कविता आणि गजानन यांचे वर्षभरापूर्वीच लग्न झाले होते. तप झाल्यानंतरच काही दिवसांत गजाननचे घरचे लोक कविताचा पैशासाठी छळ करत होते हे पोलिसांना समजून आले. या कारणातून कविताने हर्सुल पोलीस ठाण्यात तक्रारही दाखल केल्याचे पोलिसांना समजल्यानंतर पोलिसांना खात्री होवू लागली को कविताच्या मृत्यूमागे नक्कीच काहीतरी कटकारस्थान आहे, पण तिच्या नवऱ्याला अटक केल्याशिवाय हे समजून येणार नसल्याने पोलिसांनी गजानन आढाव याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केली असता तो सर्वप्रथम आपण काहीच केले नाही, हा अपघात आहे असे भासवत होता, पण पोलिसांनी त्याला एक एक प्रश्न विचारून कोड्यात टाकले, तेंव्हा त्याला खरे उत्तर देणे भागच पडले. वर्षभरापूर्वीच लग्न झालेल्या कवितावर गजानन आढाव हा संशय घेवू लागला, कारण ती नेहमी फोनवर कोणाबरोबर बोलत असते, त्यावरून तिचे नक्कीच काहीतरी बाहेर लफडे असावे असे त्याला वाटत होते. ती सुंदर होती, त्यातच ती नोकरी करत असल्यामुळे त्याच्या मनात वारंवार संशय येत असे. याआधी त्याने दोन लग्न केली होती. ती अयशस्वी झाली होती, तरीही त्याचे तिसरे लग्न झाले असल्यामुळे आपल्याला आणखी बायका मिळतील हा आत्मविश्वास त्याच्या मनात निर्माण झाला होता. त्यामुळेच कविताचा काटा काढायचा आणि त्याचे बालंट आपल्यावर येवू द्यायचे नाही असा तो विचार करू लागला, यासाठी त्याने एक प्लॅन केला. गजानन आढाव याने आपला हा प्लॅन अंमलात आणण्यासाठी औरंगाबाद येथील कार्यालयात एक महिन्याची रजा टाकली आणि भोकरदन तालुक्यातील हसनाबाद येथे रहाण्यासाठी त्याने एक घर भाड्याने घेतले. खरे तर औरंगाबाद येथे घर घेणे गरजेचे होते, कारण दोघांनाही कार्यालयात जाण्यासाठी ते सोयीस्कर होते, पण गजाननने तसे केले नाही. दि. २७ डिसेंबर २०२२ पासून गजानन आणि कविता हसनाबाद येथे राहू लागले, त्यानंतर त्याने आपला नातेवाईक योगेश मोरे याला आपल्या कटात सामील करून घेतले. त्याला एक लाख रूपयाचे आमिष दाखवले. पैशासाठी तोही तयार झाला. आपण असा कट करू की त्यात आपण दोघेही नक्कीच अडकणार नाही असे त्यांना वाटत होते. योगेश मोरे याच्याकडे ट्रॅक्टर असल्याने त्याने या ट्रॅक्टरचा वापर या कटात करण्याचे ठरवले होते, त्यासाठी त्याने ट्रॅक्टरचा विमा काढून ठेवला. सगळा प्लॅन तयार झाला होता, आता फक्त अंमलबजावणी करणे बाकी होते. दि. ३१ डिसेंबर २०२२ ची संध्याकाळ. सात वाजले होते. गजाननने कविताला सांगितले की आपल्याला एका नातेवाईकाकडे जायचे आहे, तू तयार रहा. त्याप्रमाणे कार्यालयातून परत आल्यावर कविता तयार होवून बसली. सात वाजता गजानन घरात आला आणि कविताला घेवून बाहेर पडला. मोटरसायकलवरून ते दोघे निघाले होते, पण ज्या दिशेने जायचे होते, त्या दिशेने न जाता गजानन दुसरीकडेच जात होता. तो कुंभारी शिवारातून मोटरसायकल घेवून जात असतांना एका निर्जन ठिकाणी गजानने मोटरसायकल थांबवली. तिथे तिला मोटरसायकलवरून खाली उतरवले आणि मारहाण करू लागला. त्याने तिला इतके मारले की त्या मारहाणीत तिचा जीव गेला. त्यानंतर योगेश मोरे याला सर्व तयारी झाली आहे असे विचारत कविताचा मृतदेह त्याठिकाणी आणला. कोपडा रस्त्यावर आला. रात्री ९ ते १० चा सुमार असल्यामुळे त्याठिकाणी चिटपाखरूही नव्हते. ते पाहून कविताचा मृतदेह ट्रॅक्टरच्या चाकाखाली आणून टाकला. अपघात झाला आहे हे भासवण्यासाठी गजानन याने ट्रॅक्टरच्या दोन चाकामध्ये मृतदेह अलगद ठेवून दिला. त्यानंतर कोणीतरी सुनिल साखळे यांना कविता आणि गजाननचा अपघात झाल्याचे कळवले. गजानन रघुनाथ आढाव याने गुन्हा कबुल केल्यानंतर कविता आढाव हिच्या खून प्रकरणी भोकरदन पोलीस ठाण्यात संशयित गजानन आढाव आणि इतरांविरुद्ध कलम ३०२, ४९८ ए, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास फौजदार बी.डी. कुटुंबरे करत आहेत.

पान ८ वरून...

## विविध मागण्यांसाठी माथाडी...

अबकर शेख, दिनेश पाडोळे, किसन गुळंगे, त्र्यंबक गोडबोले, राजू जगताप, रमेश पाटील, महिला कामगार अरुणाबाई मोरे, अनिता सोनकांबळे, नंदाबाई सूर्यवंशी, धांताबाई धावारे, इंदुबाई बनसोडे, एमआयडीसीतील दयानंद खंडागळे, परमेश्वर कोठे, वसंत भालेराव, सिध्दार्थ रिद्धीवाड, रवींद्र जोगदंड, महादेव सोनवणे, महादेव ढमाले, शिवाजी मोटे, दिपक गुप्ता, बालाजी सुरवसे, तुकाराम पाटील, उत्तम पोतणे, भाजी माकेटमधील राहूल पात्रे, शरद शिंदे, अमोल सातपुते आदिंनी सहभाग घेतला.

## आई श्री देवी भराडी माते देशावरील...

याचे देखील काम हाती घेतोय. जेणेकरुन खऱ्या अर्थाने कनेक्टीव्हिटी मिळेल. तसेच प्रदूषण कमी होईल व लोकांचा वेळ वाचेल. विकासाला चालना मिळेल. विकासाची दारे खुली होतील. कोकणामध्ये पर्यटनाला खूप वाव आहे. महाराष्ट्राला ७२० कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. त्यामुळे पर्यटन व मस्त्य व्यवसायालाही मोठा वाव आहे. कोकणामध्ये इतर जिल्ह्यां पेक्षा खूप पाऊस पडत असतो. परंतु, बरेचसे पाणी हा वाहून जाते. वाहून जाणारे पाणी शॉर्टटर्म व लॉंगटर्म प्रकारचे प्रकल्प केले पाहिजेत. काजू मार्केटिंग, ब्रँडिंग सिंधुदुर्गात मालवण वेंगुर्ला काजू व आंब्याला देखील चालना द्यायची आहे. सेंद्रीय शेतीला प्राधान्य देखील राज्य शासन देत आहे. शेतकऱ्यांना पारंपरिक शेतीबरोबरच आधुनिक शेतीची जोड देणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले. केंद्रीयमंत्री श्री. राणे म्हणाले, हे सरकार सामान्य जनतेचे आहे. या सरकारच्या स्थैर्यासाठी आपण भराडी देवीला साकडे घातले असून हे सरकार आपला कार्यकाल पूर्ण करेल. शासनाने या यात्रेसाठी सुविधा उपलब्ध करुन दिल्याने भाविकांची मोठी सोय झाली आहे. यावेळी आंगणेवाडी विकास मंडळाचे अध्यक्ष भास्कर आंगणे यांचा भगवी शाल आणि रोप देवून मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

## सेवापूर्तीनिमित्त मुख्याध्यापक गोविंद...

श्रीकृष्ण थोरमोटे, महाळंग्रावाडीचे सरपंच दयानंद दंडीमे, भडी येथील उपसरपंच सूर्यकांत वीर, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील अनेक शाळेचे माजी विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व लोकनेते विकासरत्न विलासराव देशमुख यांच्या प्रतिमांचे पुजन व दीपप्रज्ज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थितांचे षविद्यालयाच्या वतीने पुष्पहाराने स्वागत करण्यात आले. विद्यालयाच्या वतीने सत्कारमूर्तीचा शाल, श्रीफळ व पुष्पहाराने गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी व मान्यवरांनी भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सत्कारमूर्तीचा गौरव केले. प्रास्ताविक बालाजी बिराजदार यांनी केले. विद्यार्थ्यांनी मनोगतांच्या माध्यमातून आठवणींना उजाळा दिला. प्रमुख अतिथींनी गोविंद गुडसुरे यांच्या स्काऊट गाईड चळवळीतील विशेष कामगिरीचा उल्लेख केला. सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्तींनी भावनिकतेने आपल्या ३१ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतील विविध आठवणींना उजाळा दिला व सर्वांचे आभार मानले.

प्रकाश देशमुख यांनी अध्यक्षीय समारोप केला. सूत्रसंचालन सचिन रणदिवे यांनी केले तर आभार शिक्षक साहेबराव कांबळे यांनी मानले. यशस्वीतेसाठी क्रीडा शिक्षक तुकाराम नागरगोजे, सांस्कृतिक विभागप्रमुख वनिता सरवदे, रेवणसिध्द खोसे, सविता देशमुख, रविशंकर मठपती, अनुसया मिटकरी, रमेश सुरवसे, अशोक आडे, बाळासाहेब रोंगे, अहिल्या मिटकरे, ज्योती शेळके व शाळेतील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## प्रा.डॉ.विश्वनाथजी कराड यांचा जन्मदिन...

रूग्णांना दिवसभर नाष्टा आणि भोजनाची व्यवस्था रूग्णालयाच्या वतीने करण्यात आली होती. या सर्व विविध कार्यक्रमास डॉ. अरुणकुमार राव, डॉ. सचिन भावठाणकर, डॉ. गजानन गोंधळी, डॉ. राजेंद्र मालू, डॉ. विद्या कांदे, डॉ. मीना सोनवणे, डॉ. संजीवनी मुंडे, डॉ. शिल्पा दडगे, डॉं. बी. डी. आडगावकर, डॉ. आशा पिचारे, डॉ सौ. कुलकर्णी, डॉ. महेंद्र बिक्कड, डॉ. शैला बांगड, मुख्य प्रशासकीय अधिकारी सचिन मुंडे, रुग्णालय प्रशासकीय अधिकारी श्रीपती मुंडे, मधुकर गुट्टे, मारुती हत्ते यांच्यासह रूग्णालयातील सर्व अधिकारी,विभाग प्रमुख व कर्मचारी यांची उपस्थिती होती. आरोग्य सुरक्षा पंधरवाडा निमित्ताने सर्वसामान्य शस्त्रक्रिया हाडांच्या शस्त्रक्रिया, प्रस्तुती सेवा व सिजर शस्त्रक्रिया, कुटुंबकल्याण, कान, नाक, घशावरील सामान्य शस्त्रक्रिया, छातीचे आणि त्वचेचे आजार व उपचार या सर्व पूर्णपणे मोफत असून सिटीस्कॅन, मुतखड्यावरील आणि कॅन्सर वरील शस्त्रक्रिया, मेंदू रोग तपासणी व उपचार, बालरोग शस्त्रक्रिया, मणक्याच्या शस्त्रक्रिया, यकृत जठर तपासणी व शस्त्रक्रिया, व्यंधत्व तपासणी व उपचार, कॅन्सर पीडित रुग्णांसाठी वेदना निवारण, प्लास्टिक सर्जरी, हृदयरोग व मधुमेह उपचार, भौतिक उपचार, दुर्बिणीद्वारे विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया माफक दरात करण्यात येणार आहे. यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात सर्व प्रकारच्या अत्याधुनिक सेवा रुग्णांना देण्यात येत असून या रुग्णालयात ७५० बेड उपलब्ध आहेत. एक्स-रे सोनोग्राफी सिटीस्कॅन एमआरआय डायलिसिस स्वतंत्र विभाग पीआयसीयु, आयसीयू, एनआयसीयु, सुसज्ज १२ ऑपरेशन थेटर्स अद्यावत प्रयोगशाळा २४ तास अपघात विभाग आणि रक्तपेढी आदी सुविधा रुग्णालयात उपलब्ध आहेत.

## साहित्य हे माणसाचं जगणं...

निमित्ताने घेतलेल्या विविध स्पर्धा विजेत्यांची नावे यावेळी घोषित केली. अतिशय रंगतदार झालेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुधीर गरड यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विविध विषयाचे प्राध्यापक विविध शाखेचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अजमोद्दिन शेख यांनी परिश्रम घेतले.

06 TO 12 FEBRUARY 2023 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 2/4/2023 9:59 PM Page 1



## एस सी बायर्न महाराष्ट्र फुटबॉल कप स्पर्धेत भाग घेण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांचे आवाहन



**पालघर/प्रतिनिधी**

राज्यात फुटबॉल खेळण्याच्या विकास व प्रसारासाठी फुटबॉल क्लब बायर्न म्युनिक, जर्मनी यांच्याशी क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांच्यामध्ये करार झाल्यामुळे राज्यांमध्ये फुटबॉल खेळण्याची लोकप्रियता वाढीस लागली. खेळाडू क्रीडा मार्गदर्शक यांनी फुटबॉल खेळातील तांत्रिक प्रशिक्षण क्रीडा नैपुण्याचा शोध घेण्यासाठी तसेच योजनाबद्ध प्रशिक्षण पायाभूत सुविधा यांना चालना मिळणार आहे. याकरिता १४ वर्षाखालील मुलांच्या एफसी बायर्न महाराष्ट्र फुटबॉल कप क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्याबाबत आयुक्त क्रीडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भिय पत्रान्वये सूचित केलेले आहे. त्यानुसार जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जिल्हा क्रीडा परिषद पालघर यांच्या वतीने जिल्हास्तरीय एफ सी बायर्न महाराष्ट्र फुटबॉल कप क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. राज्यातून २० खेळाडू जर्मनी येथे सदर प्रशिक्षणासाठी जाण्याकरिता क्रीडा नैपुण्याचा शोध घेण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालय व जिल्हा क्रीडा परिषद अंतर्गत 'एफ सी बायर्न महाराष्ट्र कप' स्पर्धेचे आयोजन जिल्हा विभागीय व राज्यस्तरीय करण्यात येणार आहे. या फुटबॉल स्पर्धा १४ वर्षाखालील मुलांच्या गटात घेण्यास येणार आहे. स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरिता खेळाडूंचे जन्म दिनांक ०१/०१/२००९ नंतरची असावी. तरी सदर स्पर्धेसाठी जास्तीत जास्त शाळा क्लब यांनी स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे व स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरिता अर्ज दिनांक ६ फेब्रुवारी २०२३ पर्यत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पालघर येथे सादर करण्यात यावेत असे आवाहन सुहास व्हनमाने जिल्हा क्रीडा अधिकारी पालघर यांनी केले आहे.

## बांधकाम क्षेत्रात नवीन कल्पना उपयुक्त -शिवराज पाटील चाकूरकर



**लातूर/प्रतिनिधी**

आज लोकांचे राहणीमान बदलत असून बांधकाम तंत्रात बदल होत आहे. या क्षेत्रात नवीन कल्पना अतिशय उपयुक्त ठरत असून त्याची माहिती देण्यासाठी रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने आयोजित करण्यात आलेला लातूर बिल्ड एक्स्पो हा दूरदृष्टीचा उपक्रम असल्याचे मत देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांनी व्यक्त केले. रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने टाऊन हॉलच्या मैदानावर आयोजित लातूर बिल्ड एक्स्पो २०२३ च्या उद्घाटन प्रसंगी चाकूरकर बोलत होते. व्यासपीठावर कालिका स्टीलचे कार्यकारी संचालक अनिल गोयल, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२चे नियोजित प्रांतपाल सुरेश साबू, असिस्टंट गव्हर्नर नंदकिशोर लोया यांच्यासह रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे अध्यक्ष वीरेंद्र फुंडीपल्ले, सचिव अमोल दाडगे, प्रकल्प प्रमुख रवी जोशी, पूर्व अध्यक्ष अनुप देवणीकर, श्रीनिवास भंडे यांची उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना चाकूरकर म्हणाले की, बांधकाम क्षेत्रात नवे प्रयोग झाले तर बांधकाम करणाऱ्यांना त्याचा उपयोग होऊ शकतो. चांगले घर बांधण्यासाठी चांगल्या साहित्याची आवश्यकता असते. त्याची माहिती नागरिकांना आवश्यक आहे. काळानुसार बांधकामाची पद्धत बदलली आहे. पूर्वी मातीची घरे होती. नंतर सिमेंटची घरे आली. आता लोखंडी खांब वापरले जात आहेत. आज आपल्या देशाची लोकसंख्या १४० कोटी आहे. ती वाढतच असून त्यासाठी अधिकाधिक घरांची मागणी कायम असणार आहे. त्यामुळे असे प्रयोग वारंवार झाले पाहिजेत, असेही चाकूरकर म्हणाले. कालिका स्टीलचे अनिल गोयल यांनी रोटरीमुळे आम्ही सर्व एकत्र आल्याचा आवर्जून उल्लेख केला. सुरेश साबू यांनी एक्सपोचा पहिला प्रयोग जालना येथे झालेला असल्याचे सांगितले. असे एक्स्पो ही काळाची गरज असून दरवर्षी त्याचे आयोजन केले जावे, असेही ते म्हणाले. असिस्टंट गव्हर्नर नंदकिशोर लोया यांनी रोटरीमार्फत समाजाला गरजेचे उपक्रम राबविले जात असल्याची माहिती दिली. रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे अध्यक्ष वीरेंद्र फुंडीपल्ले यांनी क्लबने नाविन्याचा ध्यास घेतलेला असल्याचे सांगून दरवर्षी नवे उपक्रम आणि आयोजित करतो अशी माहिती दिली. प्रारंभी रोटरीच्या वतीने वीरेंद्र पुंडीपल्ले, रवी जोशी, अनुप देवणीकर, अमोल दाडगे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. रवी जोशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. संचलन डॉ. पुरुषोत्तम दरक तर आभार प्रदर्शन सचिव श्रीनिवास भंडे यांनी केले. या कार्यक्रमास रोटरीचे माजी प्रांतपाल हरिप्रसाद सोमाणी, सुनील कोचेटा, नीळकंठ स्वामी, जे.एम. कुलकर्णी, मोईन शेख यांच्यासह रोटरीच्या विविध शाखांचे अध्यक्ष, पदाधिकारी आणि सदस्यांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## सार्वजनिक शिवजयंती समितीच्या अध्यक्षपदी अशोक नाईकवाडे



**औसा/प्रतिनिधी**

१९ फेब्रुवारी २०२३ रोजी औसा तालुक्यातील सर्व शिवप्रेमी बांधवांच्या सहकार्याने होणाऱ्या सार्वजनिक शिवजयंती समितीच्या कार्यकारणी निवडीसाठी माजी अध्यक्ष बाबासाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. समस्त शिवप्रेमी बांधवांच्या सहकार्याने औसा शहरात सार्वजनिक शिवजयंती महोत्सव भव्य दिव्य स्वरूपात साजरा होणार आहे. या कार्यक्रमांमध्ये उत्कृष्ट सजावट आणि विविध स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प शिवप्रेमी बांधवांनी केला असून जयंती समितीच्या अध्यक्षपदी अशोक नाईकवाडे, उपाध्यक्ष पुरुषोत्तम नलगे आणि गोविंद जगताप, सचिव गुंडानाथ सूर्यवंशी, सहसचिव गुणाजी पवार, कोषाध्यक्ष रमेश मोरे, सहकओष अध्यक्ष अमित शेटे, स्वागताध्यक्ष अच्युत पाटील, सजावट प्रमुख बाळासाहेब सोनवळकर, प्रसिद्धी प्रमुख गोविंद खंडागळे आणि मिरवणूक प्रमुख पदी बाळासाहेब नरवडे व आदिनाथ धानूरे यांची नियुक्ती सर्वानुमते करण्यात आली आहे. नूतन कार्यकारिणीने शिवजन्मोत्सव सोहळा अत्यंत थाटामाटा मध्ये साजरा करण्याचा संकल्प केला आहे. औसा शहरातील मराठा भवन येथे प्रतिमेचे पूजन करण्यात येणार आहे. तसेच छावा ग्रुपच्या वतीने प्रोच रोड चौकात प्रतिवर्षाप्रमाणे शिव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून शहरातील समता नगर, मुक्तेश्वर नगर या भागातही छत्रपती शिवरायांचा प्रतिमेचे पूजन करून शिवरायांना मानाचा मुजरा करण्यात येणार आहे. मराठा समाजाचे महंत राजेंद्र गिरी महाराज व मराठा समाजाचे अध्यक्ष प्रदीप मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली नूतन कार्यकारिणीने यावर्षीचा शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा करण्याचे ठरविले आहे अशी माहिती प्रसिद्धी प्रमुख गोविंद खंडागळे यांनी माहिती दिली आहे.



**भांडुप येथील सर्वोदय को-ऑपरेटिव्ह बँकेच्या अध्यक्षपदी आनंद (दादा) माइंगडे आणि उपाध्यक्ष पदी राजेंद्र मोहिते यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या दोघांचाही मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष आ. प्रविण दरेकर यांच्या हस्ते सत्कार व अभिनंदन करण्यात आले. यावेळी बँकेचे ज्येष्ठ संचालक शिवाजीराव नलावडे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.**

## देवणी पोलीस ठाणे आवारात मद्यधुंद मद्यापीचा आरडाओरड

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी पोलीस ठाणे आवारात मद्यधुंद मद्यापीने जोरजोरात आरडाओरड केल्या प्रकरणी देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशी माहीती रविवार दि.२९ जानेवारी देवणी पोलिसांनी दिली. दि.२३ जानेवारी रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास एक इसम दारू पिवुन जखमी अवस्थेत मोठ मोठयाने आरडा ओरड करीत पोस्टेला आला त्यास पोलिसांनी काय झाले म्हणुन विचारपुस करता त्याने मी दारू पिलेली आहे व मला गावात मारले आहे असे म्हटले त्यावरून त्याचे तोंडाचा वास घेतला तो आंबट उग्र वास येत होता म्हणुन पोलिसांनी त्याची वैद्यकीय तपासणी साठी यादी देवुन सरकारी दवाखाना देवणी येथे पाठविले असता वैद्यकीय अधिकारी यांनी त्याची तपासणी करून तो मद्यार्काचे सेवन केले होते व तो मद्यार्काचे आमलाखाली होता असे प्रमाणपत्र दिले. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक मुजाहीद शेख यांच्या फिर्यादीवरून देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर २१/२०२३ कलम ८५(१) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम प्रमाणे सतीश नरसींग बिरादार राहणार होनाळी याच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हेडकॉंस्टेबल विनायक कांबळे हे करीत आहेत.

## 'एटीएम'मधून पैसे चोरणाऱ्या त्रिकूटास अटक



**भिवंडी/अभिजित हिरे**

एटीएम मध्ये पैसे काढण्यासाठी गेलेल्या भोळ्याभाबळ्या नागरीकांना मदत करण्याच्या बहाण्याने एटीएम मध्ये शिरून हातचलखीने नागरीकां जवळील एटीएम कार्ड चोरी करून त्याद्वारे लाखो रुपये लुटणाऱ्या त्रिकुटास भिवंडी गुन्हे शाखेच्या पथकाने उल्हासनगर व अंबरनाथ येथून ताब्यात घेत मुसक्या आवळल्या आहेत. या तिघां जवळून दहा एटीएम कार्ड हस्तगत केले असून त्याद्वारे या तिघांनी सुमारे दहा लाख रुपयांची रक्कम चोरी केली आहे. भिवंडी गुन्हे शाखेच्या पथकाने तपासात या त्रिकुटा कडून निजामपुरा, मुंब्रा, कोळसेवाडी, मध्यवर्ती पो ठाणे उल्हासनगर, बदलापूर व क्लायन तालुका पोलीस ठाण्यातील अशाच पद्धतीने फसवणूक करीत एटीएम हेराफेरी कातून पैसे काढलेल्या नऊ गुन्ह्यांची उकल भिवंडी गुन्हे शाखेने केली आहे. विशेष म्हणजे हे तिघे ही सराईत चोर असून त्यांच्या वर या आधी सुध्दा सात फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत.

## औसात स्नेहसंमेलनात विद्यार्थीनीची छेडछाड, दोघांविरूध्द गुन्हा दाखल!

**औसा/शिवाजी मोरे**

येथील एका खासगी हॉलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनातून परतणाऱ्या विद्यार्थीनींची येथीलच दोन जणांनी छेड काढून तिच्याशी लगट करण्याचा प्रयत्न केला. याचा जाब विचारण्यास गेलेल्या मुलीच्या आईस मारहाण करुन जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी दोघांविरुध्द औसा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, २८ जानेवारी रोजी सायंकाळीच्या सुमारास येथील एका सभागृहात वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित केलेल्या गॅदरिंगमध्ये डान्स असल्याने फिर्यादीचे मुलीने डान्स केल्यानंतर स्टेजचे बाजूने फिर्यादी, मुलगी व यातील साक्षीदार फिर्यादीचा मेव्हणा असे जात असताना औसा येथील दोघांनी संगनमत करून फिर्यादीच्या मुलीकडे वाईट उद्देशाने पाहून तिच्याबद्दल अपशब्द बोलून तिची छेड काढून मुलीशी लगट करण्याचा प्रयत्न केला. असे वाईट कृत्य केल्यामुळे यातील साक्षीदार व फिर्यादीचा मेहूण्याने आरोपींना जाब विचारण्यास गेला असता आरोपींनी लाथा-बुक्क्याने मारहाण केली. तेव्हा फिर्यादी ही सोडवण्यास गेली असता तिला पण धक्काबुक्की करून शिवीगाळ केली. तसेच, जीवे मारण्याची धमकी दिली. या फिर्यादीवरुन औसा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास औसा उपविभागीय पोलिस अधिकारी मधुकर पवार हे करीत आहेत.

## देवणी येथे शिवयोगी श्रीगुरुलिंगेश्वर पालखी महोत्सव संपन्न



**देवणी/प्रतिनिधी**

येथील श्री गुरु लिंगेश्वर मठामध्ये सिद्धलिंग महास्वामीजी यांच्या आठव्या पट्टाभिषेक वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या विविध धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाले. शनिवारी (दि.४) सकाळी ९ वाजता येथील श्री गुरुलिंगेश्वर पालखी शहराच्या प्रमुख मार्गावरून निघून मठामध्ये संपन्न झाली. यानंतर दुपारी महाप्रसादाच्या कार्यक्रमाने पट्टाभिषेक वर्धापन दिन महोत्सवाची सांगता झाली.या पट्टाभिषेक वर्धापन दिनानिमित्त दि.३० जानेवारी ते ४ फेब्रुवारी दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. यामध्ये म.नि.प्र. शिवानंद महास्वामीजी हुलसुर डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज, उदगीर डॉक्टर वीरुपाक्ष शिवाचार्य महाराज, मुखेड, चंद्रशेखर शिवाचार्य महाराज, माजलगाव, अमृतेश्वर शिवाचार्य महाराज जिंतूर यांचे प्रवचन झाले. या कार्यक्रमाकरिता विशेष योगदान दिलेल्या व लिंगायत समाजामध्ये विशेष प्राविण्य मिळवलेल्या व्यक्तींचे सत्कार करण्यात आले. यामध्ये श्री गुरु लिंगेश्वर मठा करिता सिंहासन अर्पण केलेले सौ भारतबाई नामदेवराव म्हेत्रे, सिंहासनाकरिता रेखीव काम केलेले रमाकांत हरनाळे, अक्षय हरनाळे, अजय हरनाळे, या महाप्रसादाचे अन्नदाते चन्नबसप्पा बेलुरे, पुष्प अलंकार केलेले नंदकुमार जीवणे, बसवराज रंडाळे, बसवराज हरनाळे ,चंद्रकांत स्वामी पत्री, बंडेप्पा मुचळंबे, शिवकुमार मळभगे, सौ मीनाक्षी विवेक स्वामी,सौ.सुनिता कापडे, सरस्वती उमाकांत संते, मयुरी सतीश आष्टूरे यांचा सत्कार करण्यात आला. हे कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता बसवराज बुदे, काशिनाथ भद्रशेटे, बस्वराज डोंगरे संदीप जळकोटे, वसंत डोंगरे, बस्वराज बिराजदार, अनिता खुदमपुरे, उज्वला मंठोळे, शकुंतलाबाई भद्रशेटे, महादेवी तोगरगे, सौ. कलावती तोगरगे मल्लम्मा आष्टूरे ललीता नळगीरे आदींनी परिश्रम घेतले. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक व आभार प्रा. रेवण मळभगे यांनी केले.

## वाडा येथे बिबट्याने पाडला गाईचा फडशा



**वाडा** : वाडा तालुक्यातील मोज वरई गावालगत असलेल्या वन्यजीव विभागाच्या जंगलामध्ये बिबट्याचा वावर असून या बिबट्याने नुकताच एका गायीचा फडशा पाडला आहे. असे असले तरी बिबट्याचे दर्शन मात्र अजून कुणालाही झाले नाही असे वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी सांगितले. वन्यजीव वैतरणा विभागातील मोज गावाच्या जवळ कंपार्टमेंट नंबर ९२७ च्या जंगलामध्ये बिबट्याचा वावर असल्याच्या खुणा वनविभागाला मिळाल्या आहेत. २३ जानेवारीला वरई गावातील एका शेतकऱ्याच्या गाईवर बिबट्याने हल्ला करून तिला ठार केले असून याबाबत वनविभागाने पंचनामा करुन कॅमेरे लावण्यात आले होते. कॅमेरात किंवा अन्य कुणालाही बिबट्याचे दर्शन मात्र घडले नसून याबाबत लोकांमध्ये जनजागृती करण्याचे काम वन विभाग करीत असुन वन विभाग याबाबात सतर्कता पाळीत असल्याचे वनरक्षक चेतन डिंगोरे यांनी सांगितले.

## वलांडी येथे माजी आमदार धर्माजी सोनकवडे यांच्या फलंदाजीने खुले टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे शुभारंभ



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील वलांडी येथील कवठाळ रोडवरील मैदानावर खुले टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे शुभारंभ बुधवार दि.१ फेब्रुवारी रोजी माजी आमदार धर्माजी सोनकवडे व लातूर जिल्हा परिषदेचे माजी जिल्हा अध्यक्ष पंडीतराव धुमाळ व चेअरमन व्यंकटराव पाटील यांच्या हस्ते नारळ फोडून व फलंदाजी करून करण्यात आले. स्पर्धेत एकुण ५२ क्रिकेट संघांनी प्रवेश घेतला असून यात लातूर, उमरगा, बसवकल्यान, भालकी, औराद शहाजाणी, कासारसीरसी सह आदी छोट्या मोठ्या ठिकाणाहून आलेल्या संघात क्रिकेट सामने खेळविण्यात येणार आहेत व तसेच जागृती साखर कारखाना महिला क्रिकेट संघ आणि धनेगाव येथील महादेव विद्यालय महिला क्रिकेट संघात रविवार दि. ५ फेब्रुवारी रोजी सामना होणार आहे. दररोज सकाळी १० वाजल्यापासून तीन सामने खेळविले जाणार असून प्रतेक सामना ८ षटकांचा होणार आहे तर अंतिम सामना १० षटकांचा खेळविण्यात येणार आहे. प्रथम येणाऱ्या संघास लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष पंडीतराव धुमाळ यांच्या वतीने रोख ५१ हजार रुपयांचा पारितोषिक देण्यात येणार आहे. तर द्वितीय येणाऱ्या संघास धनेगावचे उपसरपंच रविंद्रकुमार पाटील यांच्या वतीने २१ हजार रुपयांचा पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे. व तसेच तृतीय येणाऱ्या संघास काँग्रेस किसान सेलचे देवणी तालुकाध्यक्ष दत्ता डुब्बे यांच्या वतीने ११ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. व तसेच इतर पारितोषिके वितरण करण्यात येणार आहे. स्पर्धेच्या शुभारंभ प्रसंगी डॉ. अरविंद भातंब्रे, माजी सरपंच राम भंडारे, उपसरपंच प्रा. महेमूद सौदागर, माजी उपसरपंच दिनेश पाटील, उद्योजक राजकुमार हुडगे, स्पर्धेचे आयोजक शफीक सौदागर, मुस्ताक क़ादरी, रवी गायकवाड, मोईन सौदागर, बाळु पाटील, दीपक कल्लूरे, खमर मल्लेवाले, धनराज बिरादार, हकीम बौडीवाले, आहेमद सौदागर, मौला शेख, मुकेश कांबळे, नितीन वाघमारे तोफीक जमिंदार यांच्यासह आदी क्रिकेट प्रेमींची उपस्थिती होती.

## शेलटे येथील बंधारा व नळ पाणीपुरवठा योजनेची जिल्हा परिषद अध्यक्ष संदेश ढोणे यांनी केली पाहणी



**वाडा/प्रतिनिधी**

दीड वर्षापूर्वी वाडा तालुक्यातील शेलटे गावातील बंधारा अतिवरिष्टीमुळे वाहून गेला होता. यावेळी शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या बांधाऱ्याची दुरुस्ती दुरुस्ती करण्यासाठी ग्रामस्थांच्या वारंवार मागणी होत असल्याने पालघर जिल्हा परिषदेचे बांधकाम वर्षे आरोग्य समितीचे सभापती संदेश ढोणे यांनी प्रत्यक्ष पाहाणी केली. शनिवारी (दि.४ फेब्रुवारी) सभापती ढोणे यांनी शेलटे येथील शेतकऱ्यांना शेतीपूरक भाजीपाला व इतर व्यवसायासाठी मदत होण्यासाठी प्रत्यक्ष बंधाऱ्यांची पाहणी करून कायमस्वरूपी दुरुस्ती होणे व योजनेबाबत सरपंच व ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेऊन उपअभियंता पाणीपुरवठा विभाग यांना फोन द्वारे संपर्क करून सोडवण्याबाबत सूचना केल्या. तसेच ग्रामपंचायत शेलटे वाघोटे येथील शेलटे नळ पाणीपुरवठा योजनेचीही पाहणी केली. दरम्यान अंगणवाडीची छप्पर दुरुस्ती, जिल्हा परिषद शाळा शौचालय, स्मशानभूमी रस्ता व इतर समस्यांबाबत ग्रामपंचायत नवनिर्वाचित सरपंच उपसरपंच व सदस्य यांच्याशी चर्चा केली. प्राथमिक आरोग्य केंद्र गोर्हे, उपकेंद्र सापने येथे भेट दिली व उपस्थित राहणे कर्मचारी डॉक्टर्स यांच्या समस्या जाणून घेतल्या. आढळून आलेल्या त्रुटी संदर्भात मार्गदर्शक सूचना केल्या. यावेळी सरपंच शुभांगी घोरखना, उपसरपंच भूषण पाटील, युवक अध्यक्ष जिजाऊ संघटना महाराष्ट्र सागर ठाकरे, ग्रामपंचायत सदस्य जागृती पाटील, वाडा तालुका युवा अध्यक्ष स्वप्निल ठाकरे व इतर ग्रामस्थ हजर होते.

## विहिरीत पाय घसरुन पडल्याने दोघांचा दुर्दैवी मृत्यू





देवणी : देवणी शहरालगत असलेल्या हंचनाळ शेत शिवारात शौचास गेलेल्या दोन चुलत भावांचा पाणी घेण्यासाठी विहिरीवर गेल्यावर तोल जावून विहिरीतील पाण्यात पडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास घडली. देवणी येथील घिसाडी समाजाचे तरुण नरसिंग युवराज चव्हाण वय २० वर्षे व त्याचा चुलत भाऊ संगमेश्वर संजय चव्हाण वय १८ वर्षे दोघेही राहणार देवणी हे शुक्रवारी सकाळी दररोज प्रमाणे शौचास हंचनाळ शेत शिवारात गेले होते. ते बराच वेळ घराकडे परत आले नसल्याने नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेतला असता ते हंचनाळ शिवारातील रमेश रावण बिरादार यांच्या विहिरीत पाणी घेण्यासाठी जावून पाय घसरुन दोघेही पाण्यामध्ये पडून मरण पावले आहे. अशी खबर मयताचा भाऊ अंकुश युवराज चव्हाण राहणार देवणी यांनी दिल्यावरुन देवणी पोलीस ठाण्यात आक्समिक मृत्यू नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक गणेश सोंडरे यांच्या मार्ग दर्शनाखली हेडकॉंस्टेबल नरेश उस्तुर्गे हे करीत आहेत.

# विविध मागण्यांसाठी माथाडी कामगारांचा लाक्षणिक संप यशस्वी



लातूर/प्रतिनिधी

माथाडी सल्लागार समितीची पुनर्रचना करुन पुनर्रचित सल्लागार समितीवर युनियनच्या अनुभवी कामगार नेत्याची सदस्य म्हणून नेमणूक करावी, सुरक्षा रक्षक कामगार सल्लागार समितीची पुनर्रचना करावी, विविध माथाडी मंडळाच्या पुनर्रचना करुन, पुनर्रचित माथाडी कामगार मंडळ युनियनच्या सभासद संख्येच्या प्रमाणात मंडळ सदस्यांच्या नेमणूका कराव्यात यासह १५ प्रलंबित मागण्यांसाठी राज्य शासनाकडे सातत्याने निवेदने देवून, आंदोलन करुनही काहीच होत नसल्याने महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे नेते नरेंद्र पाटील यांनी जाहीर केल्या प्रमाणे दि.१ फेब्रुवारी २०२३ रोजी राज्यभर लाक्षणिक संप करण्यात आला. यात लातूर जिल्हा शाखेच्यावतीने दिवसभर काम बंद आंदोलन करुन सहभाग नोंदविण्यात आला. माथाडी कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांकडे सातत्याने शासनाचे लक्ष वेधण्याचा आंदोलनातून प्रयत्न केला जातोय आहे, त्याचा एक भाग म्हणून युनियनच्या आदेशाप्रमाणे लातूर येथील सर्व माथाडी कामगारांनी बुधवारी आपले व्यवहार बंद ठेवले होते. छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, एमआयडीसी, गुळ मार्केट, भाजी मार्केट येथील सर्व माथाडी कामगारांनी या संपात सहभाग नोंदविला. हा लाक्षणिक संप यशस्वी करण्यासाठी युनियनचे जिल्हाध्यक्ष शिवाजी कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष बालाजी जाधव, दिलीप कांबळे, माणिक पाडोळे, नागेश मगर,जीवन भालेराव, गोविंद गवळी, बाळासाहेब कांबळे, विनोद गायकवाड, दादा गवळी, ज्ञानेश्वर खमामे, दत्ता गवळी, विजय सुरवसे, मारुती गुळंगे, भीमा कांबळे, रसुल शेख, दत्ता काळे, भगवान बनसोडे, पिंटू ठाकूर, युवराज ससाणे, ...पान ६ वर

# चवणहिप्परगा जिल्हा परिषद् प्राथमिक शाळेतील पोषण आहारची मुख्याध्यापकाने केली काळ्या बाजारात विक्री




देवणी/प्रतिनिधी

देवणी तालुक्यातील चवणहिप्परगा येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील पोषण आहारची चक्क प्रजासत्ताक दिनीच मुख्याध्यापकाने काळ्या बाजारात विक्री केले असल्याची ग्रामस्थांनी तक्रार शुक्रवार दि.३ फेब्रुवारी रोजी देवणी तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, चवणहिप्परगा येथील जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक गुंडेराव जोशी यांनी दि. २६ जानेवारी २०२३ रोजी चक्क प्रजासत्ताक दिनीच शाळेतील चिमुकल्यांचे शालेय पोषण आहाराचे रेशन अंदाजे ८ ते ९ कट्टे काळया बाजारात विकले आहेत. शाळेतील चिमुकल्यांना दिला जाणारा पोषण आहार हा चिरीमीरीच्या मोहापोटी मुख्याध्यापकाने शासनाच्या नियमाचे उल्लंघन करून लहान बालकांना पोषन आहार न देता बिनधास्तपणे शासनाची फसवणुक करून शालेय पोषण आहार काळ्या बाजारात विकला आहे. या गुंड प्रवृत्तीच्या मुख्याध्यापकास तात्काळ निलंबीत करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व तसेच कार्यवाही नाही झाल्यास दि. ९ फेब्रुवारी रोजी सर्व ग्रामस्थांच्या वतीने शाळेला कुलूप ठोकुन मुख्याध्यापकाचा निषेध नोंदविण्यात येणार आहे. असा इशारा ग्रामस्थांच्या वतीने निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनावर माधव मोरे, ज्ञानेश्वर बिरादार, हैदर शेख, बालाजी बिरादार, गंगाधर गोसावी, शेषेराव मोकाशे, अमोल मोरे, आकाश बिरादार, हंसराज कांबळे, आकाश कांबळे, गंगाधर कांबळे, गौतम कांबळे यांच्यासह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या विद्यार्थिनींचा जनसंवाद अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद




वाडा/प्रतिनिधि

पालघर पोलिसांच्या जनसंवाद अभियान अंतर्गत अनेक उपक्रम शाळा तसेच महाविद्यालयात आयोजित करण्यात आले. महिला व बाल सुरक्षा तसेच करियर मार्गदर्शन, शासकीय योजना या विषयी वाडा तसेच कासा येथील सुमारे २८ आदिवासी पाडे आणि गावांमध्ये तसेच आश्रमशाळा येथे विद्यार्थिनींनी जन संवाद अभियान अंतर्गत उत्स्फूर्तपणे सहभाग घेत जनजागृती केली. मुंबई येथील एस.एन.डी.टी महिला विद्यापीठाच्या समाजकार्य विभागाच्या योजना रविंद्र वंजारे, मंगला शिलू भोये, सारिका रघूनाथ पारधी, पूजा अनिल भालेराव विद्यार्थिनींनी त्यांच्या क्षेत्रकार्यसाठी एक महिना पालघर पोलिसांसोबत समुदाय पोलिसिंगचा भाग म्हणून जन संवाद अभियान अंतर्गत अत्यंत उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पोलीस अधीक्षक, बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते गौरविण्यात आले. पोलीस प्रशासन कश्या पद्धतीने नागरिकांसाठी अंतर्गत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कसे कार्यरत असते याचा प्रत्यक्ष अनुभव सर्व विद्यार्थिनींनी घेतला. यातील एक विशेष बाब म्हणजे एकही दिवस सुट्टी न घेता सर्व विद्यार्थिनींनी अथक परिश्रम घेतले. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, दशरथ पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक, श्रीकांत शिंदे, पोलीस उपनिरीक्षक, पल्लवी बाणे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

# ४५व्या राज्यस्तरीय शल्य चिकित्सक परिषदेचे थाटात उद्घाटन



लातूर/प्रतिनिधी

लातूर सर्जिकल असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ४५व्या राज्यस्तरीय शल्य चिकित्सक परिषदेचे (मॅसिकॉन) उदघाटन माजी मंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते हॉटेल ग्रँड इंटरनॅशनलमध्ये संपन्न झाले. या प्रसंगी ऑल इंडिया सर्जिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संजय जैन, महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र शिंदे, सचिव डॉ.समीर रेगे, कोषाध्यक्षा डॉ. अंजली डावळे, लातूर सर्जिकल असो.चे अध्यक्ष डॉ. संजय वारद, लातूर मॅसिकॉनचे अध्यक्ष डॉ. दिनकर काळे, सचिव डॉ. अजय पुनपाळे, कोषाध्यक्ष डॉ. दीपक गुगळे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते आदी मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. व्यासपीठावरील मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. लातूरमध्ये होत असलेली ही दुसरी मॅसिकॉन परिषद असून यापूर्वी पार पडलेल्या मॅसिकॉन परिषदेचे उद्घाटन दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या हस्ते झाले होते. यावेळच्या उद्घाटनास माजी मंत्री अमित देशमुख यांची उपस्थिती लाभली, हा या कार्यक्रमाचा एक दुग्ध शर्करा योगच म्हटलं पाहिजे.

या राज्यस्तरीय शल्य चिकित्सक परिषदेस राज्यभरातून तब्बल १ हजार १०० हुन अधिक शल्य चिकित्सक उपस्थित आहेत, हे विशेष. यावेळी आपले विचार व्यक्त करताना माजी मंत्री अमित देशमुख यांनी लातूरच्या वैद्यकीय क्षेत्राचा बहुमान उंचावण्याचे काम जिल्ह्यात कार्यरत तज्ज्ञ शल्य चिकित्सक डॉक्टरांकडून होत असल्याचे नमूद केले. रुग्णसेवेस प्राधान्य देण्यासोबतच रुग्णांना दर्जेदार स्वास्थसेवा देण्याचे काम ही तज्ज्ञ मंडळी अहोरात्र करत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. ऑल इंडिया सर्जिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संजय जैन यांनी यावेळी आपले विचार व्यक्त करताना लातूर सर्जिकल असोसिएशनने या राज्यस्तरीय परिषदेचे नियोजन आणि आयोजन एवढे शिस्तबद्धरीत्या केल्याचे पाहून आपण अत्यंत प्रभावित झाल्याचे सांगितले. लातूर मॅसिकॉनचे अध्यक्ष डॉ. दिनकर काळे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात या परिषदेच्या आयोजनामागची पार्श्र्वभूमी विस्तृतरित्या नमूद केली. या कार्यक्रमास लातूर शहरातील सर्व डॉक्टर्स उपस्थित होते. या उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन डॉ. ऋजुता अयाचित यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. अजय पुनपाळे यांनी केले.

## आई श्री देवी भराडी माते देशावरील, राज्यावरील अरिष्ट दूर कर

# कोकण क्षेत्र नियोजन विकास प्राधिकरणाची निर्मिती करणार -मुख्यमंत्री




सिंधुदुर्गनगरी/प्रतिनिधी

आई श्री देवी भराडी माते देशावरचं, राज्यावरचं अरिष्ट दूर कर..बळीराज्याला, सर्व सामान्यांना सुखी अणि समाधानी ठेव, अशी प्रार्थना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी करतानाच, कोकणाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी कोकण क्षेत्र नियोजन विकास प्राधिकरणाची निर्मिती करण्यात येणार असल्याची घोषणाही केली.

आंगणेवाडी येथील श्री.देवी भराडी मातेचे दर्शन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी आज घेतले. यानंतर झालेल्या कार्याक्रमात ते बोलत होते. यावेळी केंद्रीय सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे, उद्योग मंत्री उदय सामंत, शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार कालीदास कोळंबकर, आमदार नितेश राणे, माजी खासदार निलेश राणे, माजी आमदार रविंद्र फाटक, राजन तेली आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, अंतर्गत रस्ते देखील महत्वाचे आहेत. एमएमआरडीएच्या धर्तीवर एमआयडीसी, सीडको व एमएसआरडीसी यांना सोबत घेऊन कोकण क्षेत्र नियोजन विकास प्राधिकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे कोकणाला त्याचा खूप फायदा होईल. हे प्राधिकरण अतिशय महत्वाचे आहे. श्री. देवी भराडी आईच्या दर्शनाला आलेल्या लाखो भाविकांच, भक्तांच मी मनापासून स्वागत करतो. त्यांना सुभेच्छा पण देतो. राज्यातील जनतेला, बळीराजाला त्यांच्या जीवनामध्ये सुख, समृध्दी, भरभराटी त्यांना चांगलं आरोग्य मिळू दे. तसेच त्यांच्या जीवनात आनंदाचे क्षण व समाधान आले पाहिजे, अशी मी प्रार्थना करतो. त्याचबरोबर राज्याच्या सर्वांगिण विकास करण्यासाठी आपण प्रामाणिक प्रयत्न करुया, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, सागरी महामार्ग हा कोकणच्या विकासासाठी अतिशय महत्वाचा आहे. त्याचेही काम हातामध्ये घेत आहोत. त्यांचे रुंदीकरण करण्याचा काम आपण करतोय. जेणेकरुन कोकणच्या पर्यटनाला चालना मिळेल. सगळे सागर किनारे हे अतिशय सुंदर आहेत. त्यांचे सुशोभिकरण करण्यात येईल. बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्ग नागपूर-मुंबई महामार्गाच्या धर्तीवर आपण ग्रीनफिल्ड रस्ता मुंबई-सिंधुदुर्ग फास्टट्रॅक कंट्रोल ...पान ६ वर

## सेवापूर्तीनिमित्त मुख्याध्यापक गोविंद गुडसुरे यांचा सत्कार



लातूर/प्रतिनिधी

येथील मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट अंतर्गत चालणार्या श्रीराम विद्यालय, श्रीरामनगर, महमदापूर शाळेचे विद्यार्थीप्रिय व कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक गोविंद केरबा गुडसुरे हे नियत वयोमानानुसार दि. ३१ जानेवारी २०२३ रोजी सेवानिवृत्त झाल्याने विद्यालयाच्या वतीने त्यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा पार पडला. या निमित्त शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रवेशद्वारापासून सभागृहापर्यंत पुष्पवृष्टी करत वाजत - गाजत सत्कारमूर्तींचे स्वागत केले. अध्यक्षस्थानी लातूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रकाश देशमुख होते तर प्रमुख अतिथी म्हणून राज्य प्रशिक्षण आयुक्त, भारत स्काऊट गाईड कार्यालय, मुंबई येथील गोंविद केंद्रे व जिल्हा संघटन आयुक्त, स्काऊट गाईड कार्यालय, लातूर येथील शंकर चामे हे उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट अंतर्गत चालणार्या सर्व शाळेचे मुख्याध्यापक व महमदापूरचे सरपंच अंकुश बनसोडे, पोलिस पाटील ...पान ६ वर

# प्रा.डॉ.विश्वनाथजी कराड यांचा जन्मदिन उत्साहात साजरा



लातूर/प्रतिनिधी

माईर्स् एमआयटी पुणे या शिक्षण संकुलाचे संस्थापक विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथजी कराड यांचा जन्मदिन लातूर येथील यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात विविध उपक्रमाद्वारे साजरा करण्यात आला. दि. ३ ते १७ फेब्रुवारी २०२३ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य सुरक्षा पंधरवडयाचा शुभारंभ करण्यात आला. गोरगरीब आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा ध्यास घेतलेले, शून्यातून विश्व निर्माण करणारे एमआयटी शिक्षण समूह पुणे आणि विश्र्वशांती केंद्र आळंदी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब यांचा ३ फेब्रुवारी ८२ व्या जन्मदिन यानिमित्ताने एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय लातूर आणि यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुणालय लातूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य सुरक्षा पंधरवडयाचा शुभारंभ एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राचार्य एन. पी. जमादार, उपप्राचार्य बी. एस. नागोबा, शैक्षणिक संचालक डॉ. चंद्रकांत शिरोळे, मानव संसाधन अधिकारी श्री. ऋषिकेश कराड, प्रशासकीय संचालिका डॉ. सरिता मंत्री, रुग्णालय अधिक्षक डॉ. चंद्रकला डावळे, डॉ. वर्षा कराड आदि मान्यवरांच्या शुभ हस्ते करण्यात आला. मोफत सर्व रोग निदान व उपचार आरोग्य सुरक्षा पंधरवाडा याबरोबरच यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयात आयोजित करण्यात आलेल्या मोफत मधुमेह तपासणी शिबिर, महिलाकरिता आयोजित कर्करोगाची तपासणी, लहान बालकात आढळून येणाऱ्या थॅलेसिमिया रुग्णांची तपासणी व उपचार शिबिर आणि रक्तदान शिबिराचे उद्घाटन याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. श्रीमती सरस्वती कराड रक्तपेढीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ८५ जणांनी रक्तदान केले. यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुणालयात आयोजित मोफत सर्व रोग निदान व उपचार आरोग्य सुरक्षा शिबिराचा पहिल्याच दिवशी सर्व प्रकारच्या रुग्णांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला हे शिबिर सलग पंधरा दिवस सुरू राहणार आहे. यशवंतराव चव्हाण ग्रामीण रूग्णालयात उपचार घेत असलेल्या सर्व प्रकारच्या ...पान ६ वर

# साहित्य हे माणसाचं जगणं समृद्ध करतं -कवी संजय घाडगे



औसा/प्रतिनिधी

साहित्य हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे, साहित्याने मनोरंजन, प्रबोधनासह माणसाचं आयुष्य समृध्द करण्याचे काम केले जाते असे प्रतिपादन महाराष्ट्रातील सुप्रसिध्द कवी संजय घाडगे यांनी येथे केले. श्री कुमारस्वामी महाविद्यालयात मराठी भाषा पंधरवड्या निमित्त मराठी विभागाच्या वतीने काव्यगंध या बहारदार काव्य मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी कवी संजय घाडगे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेश्वर बेटकर होते. मंचावर आझाद महाविद्यालयाचे डॉ.दुष्यंत शिंदे व प्रा.श्रीधर पाटील यांचीही उपस्थिती होती. विविध रसांनी युक्त अशा रंगतदार कार्यक्रमात अनेक कवितांचे आपल्या सुमधुर आवाजात कवी संजय घाडगे यांनी गायन केले. 'प्रेम' ही संकल्पना आणि त्याचे अनेक पदर काव्याच्या माध्यमातून व्यक्त करताना उदात्त आणि शाश्र्वत प्रेम कसे असते ते त्यांनी सये तुझ्या डोळ्यामंदी माझं गाव गं, काळजावरी गोंदलेलं तुझं नाव गं. या काव्य रचनेतून सांगितले. आई,बापाचे वात्सल्य आणि कारुण्य व्यक्त करणारी त्यांची कविता अनेकांच्या डोळ्यात पाणी आणणारी ठरली.काव्य मैफिलीचा शेवट करताना युगायुगांचे दुःख 'हुंदके युगांचे' या गझलेच्या माध्यमातून त्यांनी मांडून श्रोत्यांना अंतर्मुख केले.या बहारदार काव्य गायनामुळे काव्य रसिकांनी भर दुपारी कवितेचं चांदणं अनुभवलं. शेवटी अध्यक्षीय समारोपात प्राचार्य बेटकर यांनी कविता ही कमी शब्दात मोठा आशय मांडणारी असून तिची उत्कटता ही माणसाच्या अंतःकरणाला सहजपणे भिडणारी असते असे मत व्यक्त केले. मराठी विभाग प्रमुख डॉ. अनिल कांबळे यांनी प्रास्ताविक करताना मराठी भाषा पंधरवाडा साजरा करण्यामागील उद्देश,मराठी भाषेचा इतिहास आणि महत्त्व सांगितले. मराठी विभागाने या पंधरवड्याच्या ...पान ६ वर